मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी, २०२२
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष बाविसावे
अंक पहिला

नवीन संहिता... नवा आशय...

ईस्ट इंडिया कंपनीच्या 'अराजका'च्या खेळाने हादरणारे विश्व आणि सत्तालोलुपता, क्रूरता, जुलमी लष्कराची बेबंदशाही, समृद्ध भारताची लूट; म्हणजेच 'कंपनीराज'चे 'अराजक'

अराजक

द ईस्ट इंडिया कंपनी : एका व्यापारी कंपनीचा जुलमी कारभार



लेखक
विल्यम डॅलरिंपल
अनुवाद
रेश्मा कुलकर्णी-पाठारे

पृष्ठसंख्या : ५६८ । किंमत : ₹७९५ । पोस्टेज : ₹५०

Book Available

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जानेवारी २०२२ ◆ वर्ष बाविसावे ◆ अंक पहिला

संपादक

सुनील मेहता

संस्थापक संपादक

शंकर सारडा

संपादन साहाय्य

पूजा भडांगे

अंकाची किंमत १५ रु.

वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी :

दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

अनुक्रमणिका

संपादकीय	**४**
साहित्यवार्ता	**१०**
मागोवा	**१२**
एक एक पान घडताना...	**१८**
पुस्तक परिचय	
कथा या क्षणाची	२४
द मिसिंग	२८
द स्टोनहेंज लेगसी	३४
कमबख्त निंदर	३८
अपूर्व, अलौकिक, एकमेव...	४६
गुंतवणूकभान	५०
अभिप्राय	**५८**
दिनविशेष	**६२**

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

साहित्य संमेलनाचा उत्साह आणि नववर्षाचं स्वागत

सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्ष उजाडलंय. नव्या इच्छा, नव्या आशा नवी स्वप्नं यांनी आपली बाळमुठ उघडायला सुरुवात केलीय. कित्येकांच्या संकल्पांचे नियोजन आता प्रत्यक्षात आकार घेऊ लागेल. आता तर शाळा-महाविद्यालयेही मोठ्या विरामानंतर गजबजू लागली आहेत. महाविद्यालयांच्या परिसरात पुन्हा एकदा विद्यार्थ्यांची गर्दी दिसू लागलीय. एकंदरीत हे नवं वर्ष आपल्या सर्वांसाठी उमेदीची नवी पहाट घेऊन आलंय.

गेल्या वर्षाच्या अखेरीस उत्साहात पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामुळे लिहित्या वाचत्या मंडळींतील उत्साह द्विगुणीत झालाय. त्यांचेही वर्षभराचे नवे आराखडे आता अधिक जोमाने रंगू लागतील. संमेलनात मेहता पब्लिशिंग हाऊसने केवळ ग्रंथ प्रदर्शन आणि विक्रीवर सगळा भर न देता भरगच्च असे साहित्यिक उपक्रम तीनही दिवस राबवले होते. या उपक्रमांना संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. छगन भुजबळ यांच्यापासून अनेक मान्यवर लेखक-वाचक मंडळींनी भेट दिली. संमेलनाला आलेल्या थोरामोठ्यांसहीत तरुणवर्गानेही या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. कवयित्री शांताबाई शेळके यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून केलेले कविता वाचन, विविध विषयांवरचे परिसंवाद

आणि 'कशीर' व 'आंबी' या बहुचर्चित पुस्तकांचे प्रकाशन या सगळ्याच आगळ्यावेगळ्या उपक्रमांची रसिकांनी दखल तर घेतलीच पण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या कामाचे वेगळेपणदेखील संमेलनात दिसून आले. या संमेलनाला तरुणवर्गाने मोठ्या प्रमाणात हजेरी लावल्याने ग्रंथ प्रदर्शनातही त्यांचा वावर अधिक दिसून येत होता ही अत्यंत आनंदाची बाब ठरली.

हा तरूणाईचा काळ म्हणजे सर्वांसाठीच मोठा जिव्हाळ्याचा विषय आहे. सर्वांचा हवाहवासा वाटणारा हा जीवनाचा टप्पा म्हणजे उत्साह, धैर्य, शक्ती, बिनधास्तपणा, यांनी ओसंडून वाहणारा प्रवाहच! या काळात प्रत्येकजण फास्टट्रकवर राहण्याची अपेक्षा बाळगून असतो. तसंच स्वतःच वेगळं विश्व निर्माण करण्याच्या घाईगडबडीतही असतो, पण हळूवार पावलांनी हे मोरपंखी दिवस कसे संपून जातात हे मात्र कळत नाही. तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना शिक्षण, नोकरी, व्यवसाय मित्रमैत्रिणी व जीवनसाथी निवडणे अशा अनेक आघाड्यांवर एकाचवेळी लक्ष केंद्रित करायचं असतं. यातच आजचं हे युग म्हणजे स्पर्धेचं युग. या युगात स्वतःचा वेगळा कस निर्माण करण्याची वेगळीच आव्हानं समोर उभी असतात. चालताना, बसमध्ये, वाहनं चालवताना, मोबाईलवर बोलताना, काम करताना निव्वळ आणि निव्वळ धांदल. कितीही दगदग आणि तणाव असला तरी या वयाची लज्जतच काही और! त्यामुळेच फिराक गोरखपुरी लिहितात की, रात भी निंद भी कहानी भी, हाय क्या चीज है जवानी भी।

ही तरुणाई म्हणजे सळसळता उत्साह, उमेद प्रेम आणि धैर्याचा सुरेख मेळ.. पण कालानुरूप तरुणाईमध्येही खूप फरक पडतो. कुठे तो बनगरवाडीतील धोतराचा सोगा पकडून शाळेतील विद्यार्थी शोधणारा तरुण शिक्षक तर कुठे आजचा इंग्रजी हाय-फाय बोलत बीपीओ, कॉलसेंटरमध्ये गडगंज पैसा कमवणारा तरुण यात जमीन आसमानाचा फरक आहे. पण तरूणाई म्हटलं की आठवते ती झिंग, धमन्यात खेळणारं सळसळणारं रक्त. तरूणाई म्हणजे हुरहूर, तरूणाई म्हणजे दगदग, तरूणाई म्हणजे बडबड, तरूणाई म्हणजे गडबड, गोंधळ.. तरूणाईचा काळ म्हणजे नाविन्याचा शोध घेण्यासाठी निसर्गाने उभारलेलं मुक्त विद्यापीठ. जिज्ञासा, निकोप दृष्टिकोन आणि समजूतदारपणा यामुळे जीवनाला गहिरेपणाचे रंग प्राप्त होत जातात. या उमेदीच्या काळात माणूस खऱ्या अर्थाने घडत असतो. भरारी घेत असतो, बिघडत असतो, कोसळत असतो. मात्र त्याच्या पाहण्याच्या दृष्टिकोनातही

अनेक बदल घडत असतात. हा काळ जितका लाभदायक, तितकाच धोकादायक आहे. या तरूणाईच्या नाक्यावर अनेक वाटा फुटलेल्या असतात. मनाला आवरणं अतिशय कठीण, जिथून आपल्याला फक्त एकच वाट निवडावी लागते. जी पुढे आपली जीवनरेषा होऊन जाते.

आजच्या घडीला प्रचंड शक्तीचा अद्भुत साठा असलेल्या तरूणाईचा योग्य वापर झाल्यास अनेक विधायक कार्ये अगदी सहजपणे होऊन जातात. याची अनेक उदाहरणे देता येतील. कित्येक तरुण आज कला, क्रीडा, शिक्षण नाट्य या क्षेत्रात आपलं नाव कमावून दशाभिमान वाढवत आहेत तर अनेक तरुण सामाजिक कार्यातही सर्वस्व झोकून देऊन काम करतानाही दिसताहेत. पण नाण्याची दुसरी बाजू जशी असते तशीच व्यसनाधीन झालेल्या तरुण वर्गाची वाढती संख्याही आपल्या नजरेसमोर येत राहते. पुरेपूर शिक्षण आणि योग्य मार्गदर्शन यांच्या अभावाने नैराश्यातून आत्महत्या करणारी मुलंही दुर्लक्ष करता येत नाहीत. त्यामुळे तरूणाईचा काळ अतिशय अमूल्य असल्याने योग्य संगतीत तिला आकार दिला तर भविष्य निश्चितच उज्ज्वल होईल. याच तरूणाईचा विचार ध्यानात घेऊन आपण अनेक पुस्तके आजवर प्रकाशित केली आहेत. त्यापैकी 'चला ! उड्डा ! कामाला लागा !', 'डिजाईन युवर करियर', 'गुरुकिल्ली स्मरणशक्तीची', 'हे वयंच वेडं असतं', 'आय हॅव अ ड्रीम', 'लिंकन ऑन लीडरशीप', 'निरामय यशासाठी ध्यान', 'शाईन ब्राईट', 'स्वतःला अविस्मरणीय बनवा', 'स्वयंप्रेरणेतून ध्येयपूर्तीकडे', 'टीनएजर्स अ नॅचरल हिस्ट्री', 'द मॅजिक ऑफ थिंकिंग बिग', 'चाकाची खुर्ची', 'आय डेअर', 'कर हर मैदान फतेह', 'लाईफ विदाऊट लिमिट्स' आणि 'विटामिन जिन्दगी' ही काही महत्त्वाची आणि प्रेरणादायी पुस्तके आहेत. या तरूणाईच्या काळात ज्याने पुस्तकांचा हात धरला तो कधीही एकटा पडत नाही. या युवापिढीच्या हातात उत्तमोत्तम पुस्तके देण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील राहू. स्वामी विवेकानंद एके ठिकाणी म्हणतात की, 'आपणच आपले भाग्यविधाते असतो.' त्याप्रमाणे हा भाग्यविधाता काळ आपल्या सर्वांच्या आयुष्यात लाभदायी आणि आरोग्यदायी ठरो, हीच मनोकामना !

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

Available on

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

मेहता पब्लिशिंग हाऊस

टी बुक क्लब

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

मेहता पब्लिशिंग हाऊस

amazon | GET IT ON Google Play | Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

eBooks

www.amazon.in

play.google.com

https://books.apple.com

Online पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

प्रसाद नातू यांचा 'होस्ट इज घोस्ट' कथासंग्रह प्रकाशित

गेले पाचशेहून अधिक दिवस समाज माध्यमांवर तितक्याच पुस्तकांचा परिचय करून देणाऱ्या पुस्तकप्रेमी समूहाचे सदस्य प्रसाद नातू यांच्या 'होस्ट इज घोस्ट' या उत्कंठावर्धक कथासंग्रहाचे प्रकाशन बँक ऑफ इंडियाचे झोनल मॅनेजर हेमंत खरे यांच्या हस्ते व ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता व बँकेचे निवृत्त डेप्युटी झोनल मॅनेजर कृष्णा दिवटे यांच्या उपस्थितीत झाले.

यावेळी अनिल मेहता, राजेंद्र कुलकर्णी, इलाही सय्यद, विकास मोघे, रमेश मोहिते, राजन पोळ, कैलास चौधरी, अरविंद लाटकर, अजिंक्य लाटकर, सलील नातू, लीना गुळवणी आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन अशोक चौगुले यांनी केले. भावना नातू यांनी आभार मानले.

कोंकणी भाषेतील साहित्यकार दामोदर मावजो यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर



देशाचा सर्वोच्च साहित्य पुरस्कार मानला जाणारा ज्ञानपीठ या वर्षी दोन साहित्यिकांना जाहीर झालाय. त्यात कोंकणी कथा, कादंबरीकार दामोदर मावजो आणि आसामी कवी नीलमणी फूकन यांचा समावेश आहे. आसामी भाषेतील साहित्यिकाला ज्ञानपीठ मिळण्याची ही तिसरी वेळ तर कोंकणी भाषेसाठी हे दुसरं ज्ञानपीठ आहे. दामोदर मावजो म्हटलं की कोंकणी साहित्याला समृद्ध करणाऱ्या लघुकथा आठवतात. मावजो यांचा जन्म १९४४मध्ये दक्षिण गोव्यातील माजोर्डा इथे झाला. त्यांचं शालेय शिक्षण गोव्यात तर पदवी शिक्षण मुंबईत पूर्ण झालं. 'गांथन' हा मावजोंचा पहिला कथासंग्रह १९७१ मध्ये प्रकाशित झाला. त्यानंतर १९८३मध्ये त्यांच्या 'कार्मोलिन'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेला आहे. या कादंबरीचं बारा देशी-परदेशी भाषांमध्ये भाषांतर केलं गेलं असून, गोवा कला अकादमी आणि गोवा साहित्य मंडळाच्या पुरस्कारांनीही मावजो सन्मानित आहेत. दामोदर मावजो हे गोव्याचे कादंबरीकार, स्तंभलेखक, पटकथालेखक म्हणून ओळखले जात असून, मानाच्या ज्ञानपीठ पुरस्काराने त्यांचा गौरव अधिक वाढला आहे.

९४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नाशिक

दि.३ ते ५ डिसेंबर, २०२१

कुसुमाग्रजनगरीत रंगलेला साहित्यमेळा

मेहता पब्लिशिंग हाऊसचा अभिनव 'मेहता मराठी साहित्योत्सव'

९४व्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनात मेहता पब्लिशिंग हाऊसने एक नवा अभिनव उपक्रम राबविला. प्रकाशक म्हणून संमेलनात केवळ पुस्तक विक्रीसाठी हजेरी न लावता लेखक आणि वाचक यांच्यात विशेष संवाद घडवून आणण्याचा प्रयत्न मेहता पब्लिशिंग हाऊसने केला. एका स्वतंत्र दालनात भरगच्च साहित्य उपक्रम असणारा मेहता मराठी साहित्योत्सव संपन्न झाला. यावेळी नवोदित लेखकांना आणि वितरकांना संवादासाठीचं माध्यम उपलब्ध करुन देण्यात आलं. या साहित्योत्सवाची खास झलक

साहित्योत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी अन्न आणि नागरी पुरवठा राज्यमंत्री छगन भुजबळ आणि श्री. सुनील मेहता

मेहता मराठी साहित्योत्सव क्षणचित्रे

विष्णुजी की रसोईचे शेफ विष्णु मनोहर आणि श्री सुनील मेहता

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्या उपस्थितीत द. मा. मिरासदार यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला.

'रेडटेप'या वाचकप्रिय कादंबरीचे लेखक आणि पत्रकार अभिजीत कुलकर्णी यांच्याशी स्वानंद बेदरकर यांनी मुक्त संवाद साधला.

कन्नड लेखिका सहाना विजयकुमार यांच्या उमा कुलकर्णी यांनी अनुवादित केलेल्या 'कशीर' कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. त्यानिमित्त पत्रकार, अनुवादक अपर्णा वेलणकर यांनी ज्येष्ठ अनुवादक उमा कुलकर्णी यांची प्रकट मुलाखत घेतली.

ज्येष्ठ कवी डॉ. महेश केळुसकर यांच्या हस्ते ख्यातनाम कादंबरीकार विश्वास पाटील यांच्या 'आंबी' या पहिल्या कादंबरीची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली.

ख्यातनाम लेखिका सुधा मूर्ती यांच्या कथांचे संजय ठोमरे आणि अनुराधा मटकरी यांनी अभिवाचन केले.

वयम् मासिकाच्या संपादक शुभदा चौकर यांच्या हस्ते राजीव तांबे यांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

शांता शेळके यांच्या जन्म शताब्दीचे औचित्य साधून वैद्य सोनाली कुलकर्णी-गायकवाड व रेणू कुबडे यांनी निवडक कवितांचे अभिवाचन केले.

विविध मंचांवर सतत सुरू असणाऱ्या विविध कार्यक्रमांसोबतच पुस्तकांचे स्टॉल्सही वाचकांचं लक्ष वेधून घेत होते. महाराष्ट्रातील अनेक नामवंत प्रकाशन संस्था या वेळी पुस्तकांच्या खजिन्यासह थाटात उभ्या होत्या. त्यात मेहता पब्लिशिंग हाऊसचा देखील समावेश होता. साहित्य संमेलनात पुस्तक- प्रदर्शन आणि विक्री यासोबतच मेहता पब्लिशिंगच्या स्टॉलवर खास कार्यक्रम आयोजित केल्याने स्टॉल नक्कीच लक्षवेधी होता. या संमेलनाच्या पहिल्या दिवशी 'मेहता मराठी साहित्योत्सव' या शीर्षकाखाली अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये अभिजात मराठी साहित्याचा वारसा देणाऱ्या शान्ताबाई शेळके आणि खुमासदार विनोदानं मराठी साहित्याचा आस्वाद वाढवणारे द. मा. मिरासदार यांचं 'मेहता मराठी साहित्योत्सवा'त विशेष स्मरण करण्यासाठी कार्यक्रमचं आयोजन केलं गेलं होतं. स्मरण 'द. मां.'चे या कार्यक्रमाला महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखेचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी उपस्थित होते. तर मिरासदारांच्या कथांचे अभिवाचन अक्षय वाटवे यांनी केले. शान्ताबाई शेळके

यांना अभिवादन म्हणून आयोजित केलेल्या कार्यक्रमात वैद्य सोनाली कुलकर्णी-गायकवाड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शान्ताबाईंच्या कवितांचे अभिवाचन केले. 'कारभार लालफितीचा..' या कार्यक्रमाअंतर्गत 'रेड टेप' या वाचकप्रिय कादंबरीचे लेखक पत्रकार अभिजित कुलकर्णी यांच्याशी संवादक स्वानंद बेदरकर यांनी मुक्त संवाद साधला. या विशेष कार्यक्रमाचे उद्‌घाटन साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि अन्न आणि नागरी पुरवठा राज्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते झाले. संमेलनात केवळ ग्रंथविक्रीवर भर न देता मेहता पब्लिशिंग हाऊस साहित्यिक उपक्रमांना प्राधान्य देत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी आयोजित केलेल्या आस्वाद विशेष कार्यक्रमात आपल्या एकाहून एक सरस कादंबऱ्यांनी मराठी वाचकांवर मोहिनी घालणाऱ्या लेखक विश्वास पाटील यांनी वयाच्या सतराव्या वर्षी लिहिलेल्या 'आंबी' कादंबरीच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाला लेखक विश्वास पाटील आणि कवी महेश केळुसकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यानंतर सुरस 'बालकथांची' मेजवानी देणाऱ्या लेखक राजीव तांबे यांच्या तीन बालकथासंग्रहांचे प्रकाशन करण्यात आले. संमेलनाच्या शेवटच्या म्हणजे तिसऱ्या दिवशी आयोजित केलेल्या कार्यक्रमात धगधगत्या काश्मीर प्रश्नावर प्रकाश टाकणाऱ्या 'कशीर' या कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी अनुवादक उमा कुलकर्णी यांची विशेष मुलाखत घेण्यात आली. ज्यामध्ये अनुवादातला भाव त्यांनी उलगडून सांगितला. तर या विशेष कार्यक्रमांची सांगता ख्यातनाम लेखिका सुधा मूर्ती यांच्या 'तीन हजार टाके' या पुस्तकाच्या अभिवाचनाने झाली. या कथांचे वाचन जयंत ठोमरे आणि अनुराधा मटकरी यांनी केले. या सर्वच कार्यक्रमांची साहित्य संमेलनात उपस्थित असलेल्या रसिकांनी आणि वाचकांनी घेतलेली दखल ही मोलाची आहे. लोकहितवादी मंडळ आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९४वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नुकतेच जल्लोषात पार पडले. अवकाळी पाऊस, कडाक्याची थंडी आणि दाट धुक्याचे घोंगावते संकट असतानाही शब्दांचा जागर करण्यासाठी आणि खचाखच भरलेल्या कार्यक्रमांची मेजवानी लुटण्यासाठी भुजबळ नॉलेज

सिटी, आडगाव येथे २ डिसेंबरपासूनच राज्यभरातून साहित्यिक, लेखक दाखल झाले होते. संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ तथा विज्ञानकथालेखक डॉ. जयंत नारळीकर हे प्रत्यक्ष उपस्थित नसले तरी त्यांच्या अध्यक्षीय भाषणाची ध्वनिफीत सभागृहात ऐकवण्यात आली. या वेळी नारळीकर यांनी 'एखादी भाषा पुष्कळ विकसित असेल तर समाजाचे बहुतेक पैलू तीत उमटतात; परंतु काही महत्त्वाचे पैलू भाषेकडून उपेक्षिले गेले तर त्याबाबतीत तिला असमृद्ध समजले पाहिजे. या मापदंडाद्वारे इंग्रजी भाषा मराठी भाषेपेक्षा अधिक समृद्ध आहे.' असे स्पष्ट प्रतिपादन केले.

या संमेलनाला उद्घाटक म्हणून मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, ज्येष्ठ लेखक आणि कादंबरीकार मा. विश्वास पाटील, प्रसिद्ध हिंदी गीतकार जावेद अख्तर लाभले होते. या वेळी उद्धव ठाकरे यांनी 'मराठी भाषेचा विकास हाच ध्यास' असा संदेश दिला. तर जावेद अख्तर यांनी संत ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, संत एकनाथ आणि हिंदीतील महाकवी कालिदास यांचा दाखला दिला. शिवरायांच्या दरबारात जसे मराठी कवी गौरविले जायचे तसा गौरव उर्दू शायरांनाही मिळायचा; कारण हे कवी-शायर सामान्य माणसांची वेदना आपल्या लेखणीतून मांडायचे; पण आजची परिस्थिती अगदी उलट आहे. आताचे राजे त्यांच्या मनाविरुद्ध लिहिणाऱ्यांना दंड करीत आहेत. सामान्यांची वेदना लेखणीतून मांडणारा राष्ट्रद्रोही ठरवला जातो, अशा शब्दांत सध्याच्या सत्ताधाऱ्यांवर टीकाही जावेद अख्तर यांनी केली. साहित्यिक विश्वास पाटील यांनी आपल्या भाषणात शिवस्मारकावर खर्च करण्यापेक्षा शिवशाहीच्या खुणा जपा, असे सांगितले. या खुणा जपल्या नाहीत तर उद्याच्या पिढीला आपला जाज्वल्य इतिहास कसा सांगणार, असा प्रश्नही उपस्थित केला. मराठी साहित्य विश्वाने अण्णा भाऊ साठे यांच्या कर्तृत्वाची दखल घेतली नाही, अशी खंत व्यक्त करत वाचनालयातील कर्मचाऱ्यांच्या अनास्थेकडेही त्यांनी लक्ष वेधले.

यंदाच्या संमेलनाचे अध्यक्ष नारळीकर हे वैज्ञानिक असल्याने ग्रंथदिंडीत विज्ञान चित्ररथ आणि सावरकरांची ग्रंथसंपदा हे प्रमुख आकर्षण होतं. विविध विषयांवर परिसंवाद, काव्यमेळा, तसेच बालसाहित्याचा ऊहापोह या संमेलनात झाला आहे. अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या इतिहासात बालकुमार मेळावा, चित्रकला-शिल्पकलेचे प्रदर्शन पहिल्यांदाच होत आहे.

त्यामुळे नाशिकच्या साहित्य संमेलनाचा परीघ विस्तारला असं म्हणायला हरकत नाही. या वेळी प्रसिद्ध सुलेखनकार अच्युत पालव यांच्या 'ऐसी अक्षरे' या कॅलिग्राफिक प्रात्यक्षिकाचे आयोजन केले होते. या वेळी श्री. पालव यांनी 'अक्षर, चित्रकला, सुलेखन कला हे साहित्य असून, या सगळ्याचा वापर आज मराठी साहित्य संमेलनात होतोय यासारखी दुसरी आनंदाची गोष्ट नाही. अक्षरे कधी जीर्ण होत नाहीत. शिल्पाकडे बघण्याची दृष्टी वेगळी असते.' असे नमूद केले. विद्यार्थ्यांच्या तोबा गर्दीने रंगलेल्या बालकुमार साहित्य मेळाव्याला ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर उपस्थित होते. साहित्य संमेलनस्थळी हा मेळावा भरला होता. या वेळी प्रभावळकर यांनी कार्यक्रम संपेपर्यंत विद्यार्थ्यांना मनसोक्त हसवत 'अभिनय हा उपजत असावा लागतो. बालसाहित्यिकांनी मराठी व्याकरण व साहित्याचे वाचन केले पाहिजे, पुस्तकांशी मैत्री केली पाहिजे.' असे मत व्यक्त केले.

संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी मुख्य मंडपात राजहंस प्रकाशनचे डॉ. दिलीप मांजगावकर व डॉ. चंद्रकांत पाटील यांनी डॉ. रामदास भटकळ यांची मुलाखत घेतली. त्या वेळी १९२४पासून सुरू झालेला प्रकाशन संस्थेचा प्रवास मांडला. मराठी साहित्यासोबतच मराठी नाटकावरदेखील उत्कृष्ट परिसंवाद संमेलनात आयोजित केले गेले होते. या वेळी ज्येष्ठ नाटककार शफाअत खान यांनी मराठी रंगभूमी शेकडो पाऊल पुढे असून, मराठी भाषेतील नाटकं अन्य भाषांमध्ये आली पाहिजेत, असे सांगून गौरव केला. संमेलनातील कविकट्टा आणि गझलकट्टा ही काव्यरसिकांसाठी मोठी पर्वणी असल्याने त्याचाही आस्वाद अनेक रसिकांनी घेतला. जवळपास ७०० हून अधिक मराठी कवींनी या कविकट्ट्यावर आपल्या कविता सादर करून संमेलनात नवा विक्रम केला होता. या कार्यक्रमाला रसिकांची लक्षणीय उपस्थिती होती.

साहित्यिक सारस्वतांचा मेळा म्हणून ओळखले जाणारे हे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यंदा जवळपास दीड वर्षाने आयोजित केले गेले होते. पुढील संमेलन लगेचच म्हणजे मार्च २०२२मध्ये आयोजित करण्यात येत असल्याने मराठी साहित्यिकांना आणि प्रकाशकांना ही पर्वणीच आहे.

एक एक पान घडताना...

–अनिल मेहता

अनुवाद क्षेत्रात यशस्वी पाऊल टाकल्यानंतर जागतिक पुस्तक बाजारपेठ समजून घेण्याच्या अनेक संधी
श्री. अनिल मेहता यांच्याकडे स्वतःहून चालत आल्या. 'फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स' सारख्या मानाच्या संस्थेने दिलेले उपाध्यक्षपद आणि तिथून पुढचा रंजक प्रवास...

५.
फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सचे उपाध्यक्षपद

एक दिवस रात्री आठ वाजता दिल्लीतून 'फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स'चे अध्यक्ष डी. एन. मल्होत्रा यांचा मला फोन आला.

तुम्ही फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सचे व्हाइस प्रेसिडेन्ट व्हाल का?

माझा विश्वासच बसेना.

मी म्हणालो, 'मला आनंदच होईल; पण मी कोल्हापूरला राहतो. कोल्हापूर - दिल्ली अंतर भरपूर आहे. माझ्याकडून काही मोठं काम होईल असं मला वाटत नाही.'

त्यावर ते म्हणाले, 'पण आम्ही गेली अनेक वर्षं तुम्हाला ओळखतो. तुमच्यातली धडपडी वृत्ती आम्ही बघितली आहे. तेव्हा तुम्ही हे पद घ्यावं, असं आम्हाला वाटतं. आम्ही तुम्हाला महाराष्ट्र, गुजरात, गोवा, कर्नाटक या प. भारत विभागाचा व्हाइस प्रेसिडेन्ट करू इच्छितो.''

मला त्यांचं बोलणं ऐकून आनंद झाला. मी फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सच्या उपाध्यक्षपदाचा तो प्रस्ताव स्वीकारला. कुठल्याही मराठी प्रकाशकाला जी संधी मिळाली नव्हती, ती मला लाभत होती.

डी. एन. मल्होत्रा त्या वेळी माझ्याबद्दल जे काही बोलले त्यावर मी आता विचार करतो, तेव्हा जाणवतं, खरोखरच त्या वेळी माझ्यात प्रचंड ऊर्जा होती. मी सतत काहीतरी धडपड करत असायचो. त्या वेळी मी एकमेव मराठी प्रकाशक असा होतो, की मी दिवसभर वर्ल्ड बुक फेअरमध्ये फिरायचो आणि नवीन काहीतरी मिळवण्याचा प्रयत्न करायचो. तिथं मी मराठी पुस्तकांचा कक्ष लावायचो. खरं तर त्यातून फायदा फार थोडा मिळायचा. पंधरा दिवस राहणं, खाणं, पॅकिंग, प्रवास असा खर्चच अधिक असायचा; पण माझ्या मनात एकच असायचं की दिल्लीत आपली मराठी पुस्तकं विकली गेली पाहिजेत. मला वाटायचं, की आपल्या कुंपणाबाहेर पडल्याशिवाय आपल्याला बाहेरचं आकाश दिसत नाही. त्यापलीकडचं जग समजत नाही. तिथपर्यंत पोहचायचं असेल, तर आधी त्या आकाशानं तुम्हाला खुणवायला हवं अन् त्यासाठी मग तुम्ही कुंपणाबाहेर पडलंच पाहिजे. मी तसं केलं. मला अनुवाद क्षेत्रातलं नवं जग दिसू लागलं. मी त्यातली संधी शोधू शकलो.

उपाध्यक्ष झाल्यावरही मी तिथं नेहमीप्रमाणं दरवर्षी मराठी पुस्तकांचा एक कक्ष लावत होतो; पण मी मराठी प्रकाशक परिषदेचा अध्यक्ष होतो, तेव्हा जागतिक पुस्तक जत्रेत प्रत्येक भाषेला एक दालन विनामूल्य मिळत असे. नेहमीप्रमाणं मी मराठी प्रकाशकांची पुस्तकं घेऊन दिल्लीत तिथं माझं दालन लावत असे. फारच थोडे प्रकाशक मला पुस्तकं देत असत. त्यामुळं मिळेल तेवढी इतरांची व आमची पुस्तकं मी लावत असे. नंतर काही प्रकाशकांच्या ते लक्षात आलं की माझीच पुस्तकं जास्त आहेत. त्यामुळं काही प्रकाशकांनी माझ्यावर टीका केली की, तिथं हे फक्त स्वतःच्या पुस्तकांचा कक्ष लावतात. मग मी निर्णय घेतला की आपलं दालन स्वतंत्र लावायचं व इतर प्रकाशकांचं

स्वतंत्र, पण शेजारीशेजारीच लावायचं. मी मराठी प्रकाशकांना खूपदा सांगायचो, 'या, तुम्ही बघा तरी. हे केवढं मोठं जग आहे.' पण सांगूनसुद्धा पुस्तकांचा कक्ष लावायला तिथं कोणी यायचं नाही. फक्त विश्वास दास्ताने व शरद गोगटे येत. ही मंडळी आपल्यातच मग्न असायची असं मला वाटतं. शेवटी मीच वेगवेगळ्या मराठी प्रकाशकांकडून पुस्तकं घ्यायचो. म्हणजे जे देतील ते. आणि मग मी दोन कक्ष लावायचो. एक मेहता पब्लिशिंग हाउसच्या नावानं, तर दुसरा मराठी प्रकाशक परिषदेच्या नावानं. पुस्तकं कोणत्याही प्रकाशकाची असो, मराठी पुस्तकं विकली गेली पाहिजेत यासाठी माझा प्रयत्न असायचा. दिल्लीतील संसदेत मराठी ग्रंथालय होतं. तिथून पुस्तकं मागवली जात. साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, यू. एस. लायब्ररी आणि अगदी दोघं - तिघं इतर मराठी ग्राहक असत. पुस्तकांची विक्री ती एवढीच; पण तरीही दहा दिवस मी नेटानं पुस्तकांचा कक्ष लावायचो.

१९९७ मध्ये मराठी प्रकाशक संघाची पुस्तकं घेऊन अमेरिकेला ह्यूस्टन येथेही गेलो होतो व तिथं त्या पुस्तकांचं प्रदर्शन भरवलं होतं.

दर दोन वर्षांनी निवडणुका होत व त्यात मी पश्चिम भारताचा उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून येत असे. आजही मी तिथं कार्यकारी सदस्य आहे.

फायदा-तोट्याचा विचार न करता एक व्यावसायिक कर्तव्य म्हणून मी व माझ्यानंतर आता सुनीलही जागतिक पुस्तक मेळाव्यात सातत्यपूर्वक भाग घेत आला आहे.

ऐंशीच्या दशकात मी मराठी प्रकाशक संघाचा अध्यक्ष होतो. त्या वेळी आपल्या प्रकाशकांना इतर भारतीय प्रकाशक कसा व्यवसाय करतात, हे समजावं म्हणून पुण्यात भारतीय भाषा प्रकाशकांचं संमेलन घेतलं होतं. त्या वेळी मध्यप्रदेशचे तत्कालीन राज्यपाल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते त्या त्या भाषेतील श्रेष्ठ प्रकाशकांचा सत्कार करण्यात आला होता व त्याचबरोबर प्रकाशकांना उपयुक्त होईल, असा एक परिसंवाद आयोजित केला होता. त्यातून प्रकाशकांमध्ये विचारांची देवाण-घेवाण झाली. त्या वेळी मला पैशाची अडचण होती; कारण मराठी प्रकाशक परिषदेकडे तेवढे पैसे नव्हते. ती जबाबदारी मी स्वतः घेतली. फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्समध्ये जे मोठे प्रकाशक मित्र होते, त्या प्रकाशकांच्या

जाहिराती गोळा करून आम्ही एक पुस्तिका करायचं ठरवलं. त्या वेळी शरद गोगटेंनी खूप मदत केली. आम्ही त्या काळात जवळजवळ लाख ते दीड लाख रुपयांच्या जाहिराती मिळवून पैसे उभे केले आणि संमेलन घडवून आणलं. असं संमेलन प्रथमच झालं.

त्यानंतरही अनुवादाविषयी, पुस्तकविक्रीविषयी, संपादनाविषयीच्या काही कार्यशाळा मराठी प्रकाशन संघामार्फत घेतल्या होत्या. अर्थात, आत्ता जेवढ्या चांगल्या प्रकारे मराठी प्रकाशन संघाचं काम चालतं, तेवढं त्या वेळी नव्हतं.

फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सचा मी व्हाइस प्रेसिडेन्ट असताना पॅरिस बुक फेअरच्या निमंत्रणावरून आम्ही दहा-बारा जण पॅरिसला स्वखर्चानं गेलो. तिथला अनुभव व काही आठवणी आवर्जून सांगण्यासारख्या आहेत.

तिथं आम्ही पॅरिसच्या विमानतळावर पोचल्या क्षणापासून ते परतेपर्यंत तिथल्या लोकांनी आमची चांगली सोय केली. आमची राहण्याची व्यवस्था एका पंचतारांकित हॉटेलमध्ये केली होती. प्रत्येकासाठी एक गाडी होती व प्रत्येकासोबत एक दुभाषी बाई दिल्या होत्या, त्या स्वतः आम्हाला कुठंही जायचं असेल, काहीही मदत हवी असेल तर उपलब्ध असायच्या. याशिवाय ते आम्हाला रोज पंचाहत्तर फ्रँक्स देत होते. फिरण्यासाठी, जेवण वगैरेसाठी खर्च करण्यासाठी. पॅरिस बुक फेअर खूप माठं होतं. तेथील बहुतांशी पुस्तकांची दालनं ही फ्रान्समधील प्रकाशकांची होती. मला फ्रेंच येत नव्हतं. त्यामुळं ज्यांना इंग्रजी बोलता यायचं ते आम्हाला इंग्रजीतून माहिती सांगत.

दालनात त्यांनी केलेली पुस्तकांची मांडणी फारच वेगळी होती. त्यांच्याकडच्या पुस्तकांच्या जॅकेट्सचेही खूप प्रकार मी पाहिले.

एक अतिशय वेगळी गोष्ट म्हणजे, प्रत्येक दालनात गेल्यानंतर तिथं शॅम्पेनची बॉटल व स्ट्रॉबेरीच्या मोठ्या बुट्ट्या ठेवलेल्या असायच्या. त्या स्ट्रॉबेरीज आपल्याकडच्यापेक्षा मोठ्या व चविष्ट होत्या. मी आजपर्यंत इतकी चविष्ट स्ट्रॉबेरी कधीही खाल्ली नव्हती. आम्ही एका वर्तमानपत्राच्या दालनाकडं गेलो, तर त्या दालनाच्या बाहेर जवळजवळ पंधरा ते वीस फूट असा मोठा डोंगर असल्यासारखा वर्तमानपत्रांचा ढीग रचलेला होता. ही एक वेगळीच कल्पना मला वाटली. काही ठिकाणी दालनाच्या आत जाताना खाली फरशीवर पुस्तकांची जॅकेट्स कार्पेटसारखी चिकटवलेली होती.

आपण भारतीय माणसं पुस्तकांवर किंवा साध्या पुस्तकाच्या जॅकेटवरही पाय ठेवू शकत नाही. आम्हाला त्यावर पाय ठेवून जाणं हे बरं वाटेना; पण इलाज नव्हता. त्यांच्यासाठी ती ग्राहकांना आकर्षून घेण्यासाठी एक सजावट होती. काही दालनांच्या आतलं जे फर्निचर होतं ते कार्डबोर्डच होतं, पुठ्ठ्यांचं. हेही काही औरच होतं.

तिथं एक भारतीय प्रकाशक होता. त्यानं तिथं काही सेमिनार्स ठेवले होते. त्या वेळी मला एक-दोन सेमिनारला जाण्याचा योग आला. तिथल्या एकंदरीत पुस्तकांच्या व्यापाराबद्दल, प्रकाशन व्यवसायाबद्दल बरीच माहिती आम्हाला मिळाली. त्यातून हे लक्षात आलं की आपलं मार्केट वेगळं असतं आणि त्यांचं वेगळं. त्यांच्याकडं पुस्तकं विकत घेऊन वाचण्याची प्रथा आहे. आपल्याकडं आहे; पण फार कमी आहे.

आपल्या भारतीय भाषा युरोपियन देशांमध्ये बोलल्या जात नाहीत. त्यामानानं तिकडं फ्रेंच भाषा ही बऱ्याच प्रमाणात बोलली जाते. त्यामुळं फ्रेंच पुस्तकं युरोपात बऱ्याच ठिकाणी विकली जातात. जर्मनी, इटली, स्वित्झर्लंड असे अनेक देश जवळजवळही आहेत. त्यामुळंही फ्रेंच भाषेतील पुस्तकं सर्वदूर जातात. अगदी फ्रेंच भाषेतील पुस्तकं इंग्रजी भाषेत मोठ्या प्रमाणात अनुवादित होतात व ती विकली जातात. मग ती आपल्याकडं येतात.

आपल्याकडं जे नवनवीन वाङ्मयीन प्रवाह दिसतात, ते युरोपियन देशांमधून आलेले असतात.

त्या वेळी माझ्यासोबत एस. के. घाई नावाचे आमचे प्रकाशक मित्र होते. त्यांना तिथली बरीच माहिती होती. ते तिथं बऱ्याचदा आपली पुस्तकं विकण्यासाठी येत असत. हॉटेलमध्ये ते माझ्या पलीकडच्या रूममध्ये राहत होते.

त्यांना मी सहज विचारलं, ''इथं काही भारतीय पुस्तकं विकणारे विक्रेते आहेत का?''

ते म्हटले, ''इंडियन कल्चर, इंडियन मायथॉलॉजी असे काही बुक स्टॉल्स आहेत, जे मुख्यतः भारतीय संस्कृतीबद्दलची पुस्तकं विकतात.''

मी म्हटलं, ''मी तुमच्याबरोबर आलो तर चालेल का?''

त्यांनी होकार दिला आणि दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच आठ वाजता आम्ही गाडीनं बाहेर पडलो. साधारण एक तासाभरानं त्यापैकी एका

बुकस्टॉलवर गेलो. आम्ही दोघं गाडीतच बसून होतो. आम्ही पाहिलं की, नुकतंच त्या पुस्तक विक्रेत्यानं आपल्या दुकानाचं शटर उघडलं होतं आणि व्हॅक्युम क्लीनरनं तो आपलं दुकान स्वच्छ करत होता. मग थोडा वेळ बाहेरच थांबून आम्ही दुकानात गेलो. एस. के. घाईंनी आपली पुस्तकं दाखवली. त्यांचे मागचे काही हिशोब होते ते बघितले व त्यांना माझी ओळख करून दिली. त्या पुस्तक विक्रेत्याशी बोलताना लक्षात आलं की तो एकच एक गोष्ट वारंवार सांगत होता, ''भारतीय प्रकाशक पुस्तकं इकडे पाठवतात; पण त्याचं पॅकिंग अतिशय वाईट असतं. पुस्तकं इतकी खराब होऊन येतात, की बऱ्याच वेळेला आम्हाला ती फेकून द्यावी लागतात.''

मी त्या वेळी जिथं जाईन तिथं माझ्यासोबत मराठी पुस्तक घेऊन जायचो. माझ्या बॅगेत कपडे कमी आणि पुस्तकं जास्त असत. रात्रीच्या वेळी मला ती वाचता येत किंवा विमानाचा प्रवास लांबचा असतो, त्या वेळी काहीतरी वाचायला मिळावं, असा एक हेतू असे. त्यामुळं तीस एक पुस्तकं तरी त्या वेळी माझ्याजवळ होती.

त्यांचं बोलणं झाल्यावर मी म्हटलं, ''मी काही मराठी पुस्तकं आणली आहेत.'' आणि ती पुस्तकं त्यांना दाखवली व विचारलं, ''तुम्ही यातील काही विकत घेणार का?'' ती सर्व पुस्तकं त्यांना पसंत पडली. ते म्हणाले, ''सगळी द्या आम्हाला.'' आणि त्यांनी ती सर्व पुस्तकं आनंदानं विकत घेतली. त्या वेळी माझ्याकडं पावतीपुस्तक नव्हतं, तर त्यांनी स्वतःचं पावतीपुस्तक वापरायला दिलं आणि माझ्याकडून पुस्तकांची पावती करून घेतली. विशेष म्हणजे पुस्तकांची नावं तेच लिहीत होते; कारण त्यांना संस्कृत चांगल्या प्रकारे येत होतं आणि त्यांनी ती सगळी नावं लिहून, हिशोब करून मला माझ्या पुस्तकांची रक्कम फ्रँक्समध्ये दिली. मला खूप आनंद झाला.

मला त्या दुकानदारामुळं समजलं, की परदेशात पुस्तकं पाठवायची असतील तर पुस्तकांचं पॅकिंग किती व्यवस्थित करावं लागतं. आज आम्ही दिल्लीला परदेशात पाठवण्यासाठी जी पुस्तकं पाठवतो, ते अतिशय व्यवस्थित बघून पॅकिंग करून पाठवतो.

(क्रमशः)



कथा या क्षणाची

रुथ ओझेकी

अनुवाद

वर्षा वेलणकर आणि

वासंती घोसपूरकर

डायरीतून उलगडणारी नाओची दाहक जीवनकथा आणि ती वाचणाऱ्या रुथची उत्सुकता.. बुकर पुरस्कार नामांकनप्राप्त एक विलक्षण कादंबरी

नाओ नावाच्या जपानी मुलीने डायरी लिहिली आहे. कॅलिफोर्नियातील सनीवेल नावाच्या भागात ती तिच्या आई-वडिलांसह राहत असते. तिचे वडील कॉम्प्यूटर प्रोग्रामिंगमधलं एक नावाजलेलं नाव असतं आणि ती तीन वर्षांची असताना सिलिकॉन व्हॅलीमधल्या एका मोठ्या कंपनीनं त्यांची निवड केलेली असते. मग ते तिकडे जातात. तसं सारं काही आलबेल असताना तिच्या बाबांची कंपनी दिवाळखोरीत निघते. त्यांना नोकरीवरून कमी करण्यात येतं, त्यांचे व्हिसा रद्द होतात आणि त्यांना तातडीनं जपानला परत यावं लागतं. हे परत येणं सगळ्यात जास्त वैताग आणणारं ठरतं; कारण एकतर तिच्या बाबांना नोकरी नसते आणि साठवलेले जे काही पैसे त्यांनी रोख्यांमध्ये लावलेले असतात, तेही बुडतात. शिवाय, टोकियो राहण्यासाठी अजिबात स्वस्त नसतं. तिचे बाबा कायम उदास राहू लागतात. आई दुःखी होते; पण घर चालवण्यासाठी नोकरी करायला लागते.

नाओवर शाळेतल्या मुलांकडून किती भयंकर प्रकारे रॅगिंग होतं, याचं वर्णन नाओ करते. तिचे बाबा एकदोनदा आत्महत्येचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांची नकारात्मक प्रतिमा नाओच्या मनात तयार होते. काही नोकरी करण्याऐवजी ते आत्महत्येचा प्रयत्न का करतात, याचं तिला आश्चर्य वाटतं. तिची पणजी जिको बौद्ध धर्माचं अनुसरण करत असते. खरं तर दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी तिच्या मुलाला म्हणजे नाओच्या काका आजोबांना फार भयंकर रीतीने जीव गमवावा लागलेला असतो. त्यांची डायरीही नाओ वाचते. त्यांच्या धाडसाने प्रभावित होते.

काही दिवस पणजीकडे राहून नाओ टोकियोला परत येते. तिच्या कौमार्यभंगाचा प्रसंगही ती डायरीत लिहिते. तिच्या पणजीच्या मृत्यूच्या प्रसंगाचं वर्णन ती करते. एका क्षणी तिला कळतं, की तिच्या वडिलांची नोकरी का गेलेली असते. ते कारण कळल्यावर तिला वडिलांविषयी खूप आदर वाटायला लागतो आणि त्यांच्या आत्महत्येच्या प्रयत्नांचं कारणही तिला कळतं. वडिलांविषयी या गोष्टी कळल्यानंतर तिच्या मनावरचं सगळं मळभ नाहीसं होतं, ती मोकळा श्वास घेते आणि जीवनावर प्रेम करायला लागते.

नाओची ही डायरी रुथ नावाची लेखिका वाचत असते. तिच्या नवऱ्याला, ऑलिव्हरला ती डायरी समुद्रकिनाऱ्यावर मिळालेली असते. रुथ

आणि ऑलिव्हर एका बेटावर राहत असतात. कादंबरी नाओ आणि रुथच्या प्रथमपुरुषी निवेदनातून पुढे सरकत राहते. नाओचं शेवटचं निवेदन वाचेपर्यंत रुथ सारखा विचार करत असते, की नाओ जिवंत असेल का, तिची आणि आपली भेट होईल का? कादंबरी वाचत असतानाच रुथ, नाओच्या आणि तिच्या कुटुंबाच्या अस्तित्वाचे धागेदोरे शोधण्याचा प्रयत्न करते. ऑलिव्हरच्या मते क्वान्टम फिजिक्सच्या एका थिअरीनुसार माणूस दोन जगांमध्ये जगत असतो. एक तर या (अस्तित्वात असलेल्या) जगात किंवा दुसऱ्या (इतरांना माहीत नसलेल्या) जगात. त्यापैकी कोणत्या जगात नाओ जगते आहे, याची रुथला उत्सुकता असते. त्या दोघींची भेट होते की नाही? वाचा 'अ टेल फॉर द टाइम बीइंग.'

नवी संहिता... नवा आशय...

वृशीर

सहना विजयकुमार

अनुवाद - **उमा कुलकर्णी**

धगधगत्या काश्मीरचं अंतर्गत कोलाहल मांडणारी,
सखोल अभ्यासांती लिहिलेली विलक्षण कादंबरी

किंमत : ४२५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

नवी संहिता... नवा आशय...

सांगाती

...स्मरणझुला एका जिप्सीचा

सदानंद कदम

साहित्यापासून संगीत-नाट्य-कलांपर्यंत, इतिहासापासून गडकोटांपर्यंत अनेक क्षेत्रातील दिग्गज प्रतिभावंतांचं जिव्हाळपण अनुभवलेल्या आणि ते शब्दबद्ध केलेल्या हरफनमौला सदानंद कदम यांची विलक्षण स्मरणयात्रा...

किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

नवी संहिता... नवा आशय...

खाकी फाइल्स

नीरज कुमार

माजी पोलीस आयुक्त, दिल्ली पोलीस

अनुवाद - **रोहन टिल्लू**

अंध:कारमय गुन्हेगारी अंतरंग आणि पोलिसी धैर्याची पराकाष्ठा यांचं मिश्रण असणाऱ्या, आयपीएस नीरज कुमार यांच्या कारकिर्दीतल्या अविस्मरणीय घटनांचा मागोवा

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

द मिसिंग

ख्रिस मुनी

अनुवाद

नारायण पै

थरारकथातल्या पुरुष नायकांचं वर्चस्व मोडीत काढणारी डर्बी मॅकोर्मिक लावतेय, शहारे आणणाऱ्या प्रकरणाचा छडा... कंठ गोठवणारी थरारकथा...

डार्बी मॅकोर्मिक, मेलानी आणि स्टेसी स्टिफन्स या जिवलग मैत्रिणी.

डार्बी आणि मेलनी या दोघी एकमेकींना लहानपणापासून ओळखत. स्टेसी त्यांच्यात थोडी उशिरा आली. कधी ते नक्की आठवत नाही. पण नंतर तिघींची गट्टी जमली. शाळा असो, लायब्ररी असो किंवा फुटबॉल मॅच अथवा पार्टी असो, तिघी एकत्र असणारच.

डार्बीने मेलनीचा दंड पकडला व बळेच ओढत-ओढत तिला त्या दाट झाडीच्या पायवाटेवरून नेऊ लागली.

''अगं, तू मला कुठं नेतेस? सांग तरी.''

''तुला कळेलच. ते एक सरप्राईज आहे. काही काळजी करू नकोस. आम्ही लवकरच तुला तुझ्या हॉस्टेलवर आणून सोडू.''

त्यानंतर वीस मिनिटांनी त्या एका निर्जन ठिकाणी येऊन ठेपल्या. डार्बीने आपल्या पाठीवरील बॅग काढून खाली टाकली. हेच ते ठिकाण होतं. ज्या ठिकाणी डार्बी आणि स्टेसी काही वेळा एक-दोन पेग व सिगारेटचा आस्वाद घ्यायला येत. ती जागा म्हणजे एक उतरती भिंत होती, ज्यावर कचरा, रिकामे बिअरचे कॅन व सिगारेटची थोटके इतस्तत: पसरलेली होती.

नवीन केलवीन क्लीन जीन्स खराब होऊ नये याची काळजी घेत, बसण्याची जागा थोडी साफ करून डार्बी हळुवार तिथं बसली. पण स्टेसी मात्र मागे-पुढे न बघता त्या कचऱ्यातच फतकल मारून बसली. स्टेसी थोडी वेगळी होती. तिचे कपडे कधी व्यवस्थित नसत. ती जरुरीपेक्षा तोकडे व घट्ट कपडे वापरत असे. ती अप्पलपोटी, स्वार्थी व बेफिकीर होती. तिचे हे वागणे म्हणजे पिढीजात हे भाव चालत आले असावेत असे तिच्याकडे पाहताच जाणवत असे.

डार्बीला तिच्या दोन्ही मैत्रिणींच्या स्वभावाची माहिती होती. दोघी भिन्न स्वभावाच्या होत्या तरी त्या तिघींची मैत्री जमली होती.

स्टेसी थोडी उथळ होती. तिचे वागणे चारचौघीसारखे नव्हते. घाणेरडे, अश्लील विनोद तिच्याकडे मुबलक होते. मुलांबद्दल तिला चांगली माहिती होती. कुठली मुलं कुठल्या थराला गेली आहेत याची तिला चांगली माहिती होती.

मेल म्हणजे मेलनी अगदी वेगळी होती. तिचं एक स्वतंत्र अस्तित्व होतं. तिचे हावभाव शांत होते.

डार्बीने बॅग उघडली आणि दोघींच्या हातात बिअरचे कॅन ठेवले.

''अरे, हे तू काय करते आहेस?'' मेलने विस्मित होऊन विचारले.

''तुला बिअरची ओळख करून देते.'' मेल थोडी कावरीबावरी झाली. अशा वेळी ती आपल्या हातातील ब्रेसलेटशी झटपट करीत असे आणि तसे ती आताही करत होती.

''चल मेल, पिऊन बघ. त्या कॅनवरचा कुत्रा तुला चावणार नाही. घाबरू नकोस,'' डार्बी गमतीने म्हणाली.

''पण तू हे का करते आहेस?'' मेलने तिला विचारले.

''अगं मूर्ख मुली, तुझा वाढदिवस साजरा करायचा आहे म्हणून.'' असे म्हणत तिने तिला कॅन उघडून दिला.

मेल स्टेसीकडे वळून म्हणाली, ''अगं, तुझ्या वडिलांच्या लक्षात आलं की, काही बिअर कॅन गायब आहेत तर?''

''आमच्या तळघराच्या मोठ्या फ्रिजमध्ये बिअरचे सहा क्रेट आहेत. त्यातले तीन-चार कॅन कमी झाल्यानं एवढं काय होईल? पण माझ्या आई-वडिलांनी मला बिअर पिताना पाहिलं तर मात्र माझी खैर नाही.''

डार्बीने आपल्या हातातील कॅन उंचावला व मेलकडे पाहून म्हणाली, ''हॅपी बर्थ डे मेलनी.''

स्टेसीने एका दमात अर्धा कॅन रिचवला. डार्बीनेदेखील एक मोठा घोट घेतला. मेलनीने मात्र चाचरत कॅन ओठांशी नेला. आधी काही वेळ वास घेतला. मेलनी कुठलाही पदार्थ खाण्यापिण्याआधी त्याचा वास घेत असे. ''शी, कुजलेल्या टोस्टसारखा वास येतोय,'' मेलनी तोंड वाकडं करून म्हणाली.

''अगं, थोडं थोडं पीत जा. हळूहळू तुला ते आवडेल.''

त्याच वेळी स्टेसीला थोड्या अंतरावरून जाणारी मर्सिडीससारखी एक गाडी दिसली.

''माझीही अशीच गाडी असेल. मीही एक दिवस अशी गाडी चालवीन.'' स्टेसी स्वप्नाळू डोळ्यांनी त्या गाडीकडे बघत म्हणाली.

''पण तुझ्या आजच्या स्थितीकडे पाहून वाटते की, तू कधीतरी कुणाची तरी ड्रायव्हर म्हणून अशी गाडी चालवशील,'' डार्बी गमतीने म्हणाली.

स्टेसी चिडून हातवारे करत म्हणाली, ''ए बावळट, मी एका श्रीमंत

मुलाशी लग्न करणार आहे आणि तो मला जगभर आलिशान गाडीमधून फिरवणार आहे.''

''स्टेसी मला सांगायला वाईट वाटते की, आपल्या बेलहेममध्ये अशी श्रीमंत मुले नाहीत.''

''म्हणूनच मी न्यू यॉर्क शहरात जाणार आहे आणि ज्याच्याशी मी लग्न करणार आहे, तो नुसताच श्रीमंत नसून मला प्रेमाने वागवणारा, पंचतारांकित हॉटेलमध्ये नेहमी नेणारा रसिक माणूस असेल. त्याच्याजवळ स्वत:चे विमान असेल. त्या विमानातून आम्ही वेस्ट इंडिजमधल्या आमच्या बिल हाउसमध्ये जाऊ.''

''मेल तुझं काय?'' स्टेसीने विचारले, ''तू काय करणार आहेस? की अजूनही चर्चमधली नन होण्याचा तुझा विचार आहे?''

''नाही. नन वगैरे काही होणार नाही,'' मेल ठसक्यात म्हणाली आणि आपला मुद्दा पटवण्यासाठी तिने बिअरचा एक मोठा घोट घेतला.

''म्हणजे त्या मायकेल अंकाबरोबर जुळवून घेतलेस?''

डार्बीला बिअर पिता पिता ठसका लागला. ती मेलकडे वळून पाहत म्हणाली, ''म्हणजे सध्या तू त्या नशाबाजाबरोबर असतेस?''

''त्याने ते कधीच सोडले आहे.''

''तसं असेल तर तू भाग्यवान आहेस,'' डार्बी तिला म्हणाली आणि स्टेसी मोठ्याने हसू लागली.

''असं काय गं? तो खरोखरच चांगला आहे.''

''होय, तो चांगला असेल. प्रत्येक माणूस सुरुवातीला चांगलाच असतो आणि तुझ्याकडून त्याला हवं ते मिळालं की, तुला तो टाकाऊ वस्तू म्हणून बाजूला करेल.''

''नाही स्टेसी, तुझे विचार मला पटत नाहीत,'' डार्बी म्हणाली. त्या वेळी तिला आपल्या वडिलांची आठवण झाली. 'बिग रेड' म्हणून लोक त्यांना ओळखत. त्यांचं आणि आईचं छान जमत असे. ते बायकोचा नेहमी आदर करीत असत. शुक्रवारी संध्याकाळी डार्बीचे आई-वडील बाहेरून जेवण करून येत असत आणि नंतर त्यांच्या आवडत्या गायकाचे फ्रँक सिनात्राचे गाणे ऐकत, तर कधी गाण्यावर गालांना गालांचा स्पर्श करून तालावर नाचत असत.

स्टेसी मेलला म्हणाली, ''हे बघ मेलनी, लक्षात ठेव आणि माझ्यावर विश्वास ठेव. कोणावरही पूर्ण विश्वास ठेवू नकोस. हे सारखेच असतात. ते नेहमी तुझा फायदा घ्यायला टपलेले असतील.'' स्टेसीचे हे भाषण आता बराच वेळ चालणार हे डार्बीला माहीत होतं. ती लांबवर दिसणाऱ्या निऑन लाइटचा क्रॉस बघत एका झाडाला टेकून बसली.

डार्बी बिअरचे घुटके घेत समोरच्या दिशेने बघत होती. समोर रूट १च्या दोन्ही रस्त्यांवर रहदारी चालू होती. डार्बी विचार करत होती, या सर्व कारमधून कोण, कुठे जात असतील. कुठे आणि कशी गंमत करत असतील? काही लोकांना महत्त्व प्राप्त होते ते कसे? वेगवेगळी माणसे, त्यांचे वेगवेगळे स्वभाव, पेहराव, केस, वर्ण हे सर्व त्यांना कसे प्राप्त होते? का देवच हे सर्व ठरवतो? मला वाटते हे सर्व देवच ठरवत असावा.

पण जशी जशी बिअर पोटात उतरू लागली, डार्बीच्या विचारांना धार चढू लागली. डार्बी अलेक्झांडर मॅकोर्मिक ही एक मोठी असामी होणार आहे. ती कोणी सिनेसृष्टीतील नायिकेसारखी नसेल आणि तिच्या आईसारखी पामोलिव्ह स्वच्छता कार्य, स्वयंपाक व छोटी-छोटी कामे नक्की करणार नाही. हे विचार डोक्यात चालू असतानाच स्टेसीच्या आवाजाने तिची विचारशृंखला तुटली.

''तू ऐकते आहेस का?''

पावलांखाली चुरगाळणाऱ्या पालापाचोळ्याचा आवाज ऐकू आला.

''एखादा रानटी प्राणी वगैरे असावा.''

''मी तो आवाज म्हणत नाही. कुणाच्यातरी रडण्याचा आवाज.''

डार्बीने बिअर कॅन टाकला आणि डोकं उंचावून पाहू लागली. तिथं कुणीच नव्हतं. पायाखाली चुरगाळणाऱ्या पानांचा आवाज वाढत होता. खरंच कुणीतरी आहे का तिथे?

चुरगाळणाऱ्या पानांचा आवाज आता थांबला होता आणि त्यानंतर हळुवार, पण स्पष्ट शब्दांत एका बाईचा आवाज ऐकू आला, ''कृपा करून मला जाऊ द्या. तू काय केलेस ते देवाशपथ मी कोणाला सांगणार नाही.''

नवी संहिता... नवा आशय...

वेगळ्या वाटेवरचा डॉक्टर

डॅमियन ब्राऊन

अनुवाद - **मंजूषा मुळे**

मूलभूत गरजांपासून वंचित राहिलेल्या आफ्रिकन नागरिकांचं करुणादायी वास्तव आशादायी करण्यासाठी झटणाऱ्या विलक्षण डॉक्टरची सत्यकथा...



किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध

दूर घर माझे...

लेइला अबोउलेला

अनुवाद - **सुनंदा अमरापूरकर**

वेगानं बदलणाऱ्या जगात
दूरदेशीच्या घरांचा
शोध घेणाऱ्या जीवांच्या कथा



किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध



द स्टोनहेंज लेगसी

सॅम ख्रिस्टर

अनुवाद

अशोक पाथरकर

माणसांचा बळी देणारा गूढ पंथ... त्यातीलच एका शास्त्रज्ञाची आत्महत्या... त्या जाळ्यात फसलेली युवती... एक रहस्यमय थरारनाट्य

'द स्टोनहेंज लेगसी' ही एक थरारक रहस्यमय कादंबरी आहे. १३ जून ते २८ जून या पंधरा दिवसांत हे थरारक नाट्य घडतं. या कादंबरीची सुरुवात होते, एका माणसाला बळी देण्याच्या प्रसंगाने. स्टोनहेंज हे पवित्र शिळा जिथे आहेत, ते वैशिष्ट्यपूर्ण स्थान. या शिळांच्या जवळपास देवांचा (सेक्रेड्सचा) वास आहे, असा एका पंथाचा ठाम विश्वास आहे. तो वास तिथे चिरंतन राहण्यासाठी प्रतिपदेच्या दिवशी एक विशिष्ट खगोलशास्त्रीय स्थिती असताना त्या शिळांसमोर या पंथाचे अनुयायी एका माणसाचा बळी देतात. ज्या माणसाचा बळी दिला जातो त्याला सात दिवस उपाशी ठेवले जाते. त्याला प्रकाशापासून, आवाजापासून दूर ठेवले जाते आणि सात दिवसांनंतर हेंजप्रमुख विशिष्ट हत्यारांनी विशिष्ट पद्धतीने त्या बळीला ठार मारतो.

विल्टशायर येथील सँक्चुअरी हे या पंथाच्या अनुयायांचं गुप्त स्थान. जिथे त्यांच्या गुप्त बैठका होतात, त्यांच्या पंथाची दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्या इसमाचा दीक्षांत विधी तिथेच होतो आणि बळीलाही तिथेच डांबलं जातं. जो माणूस स्वत: येऊन त्या शिळांना स्पर्श करेल, तो माणूस देवाला बळी म्हणून हवा आहे, अशी या पंथातील लोकांची समजूत असते. त्या शिळांना कोण स्पर्श करतंय, हे बघण्यासाठी या पंथातील टेहळे दिवसरात्र सज्ज असतात. जो माणूस त्या शिळांना स्पर्श करेल, त्याला लगेच उचलून ते सँक्चुअरीमध्ये घेऊन जातात. जर बळी देणारा माणूस बळी देण्याआधीच मेला किंवा त्यांच्या नियमांना पात्र राहिला नाही तर हेंजप्रमुखाला स्वत:चा बळी द्यावा लागतो. तसेच या शिळांना स्पर्श केलेल्या पाण्याने अंघोळ केली तर कॅन्सरसारख्या व्याधी बऱ्या होतात, असा या पंथातील अनुयायांचा अनुभव असतो. तर जिवंत माणसांचा बळी देणाऱ्या या पंथाची, त्यांच्या कार्यपद्धतीची माहिती कादंबरीच्या सुरुवातीला मिळते.

कादंबरीच्या सुरुवातीला आणखी एक थरारनाट्य सुरू झालेलं असतं. अत्यंत बुद्धिमान असलेले पुरातत्त्व शास्त्रज्ञ प्रा. नाथानिएल चेस डोक्यात गोळी झाडून घेऊन आत्महत्या करतात. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांचा मुलगा गिडियन याच्यासाठी ते एक पत्र लिहून ठेवतात. नाथानिएल आणि गीडियन यांचे संबंध दुरावलेले असतात. गीडियनही वडिलांप्रमाणेच एक बुद्धिमान पुरातत्त्व शास्त्रज्ञ असतो. वडिलांच्या मृत्यूची बातमी त्याला

पोलिसांकडून समजते. त्यांच्या आत्महत्येचा तपास डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर मेगन बेकर करत असते. तिचा नवरा ॲडम हाही पोलीस इन्स्पेक्टर आहे; पण मेगन आणि तो वेगळे राहत असतात. त्यांची चार वर्षाची मुलगी सॅमीला भेटायला ॲडम येत असतो, तेव्हा नाईलाजास्तव मेगनला त्याच्याशी बोलावं लागतं आणि एकाच खात्यात काम करत असल्यामुळे कामाच्या निमित्ताने त्यांचा संबंध येत असतो.

गिडियनच्या वडिलांनी मृत्यूपूर्वी त्याला लिहिलेलं पत्र मेगनकडून त्याला मिळतं. ते पत्र वाचून त्याच्या मनात वडिलांविषयी असलेली अढी थोडी दूर होते. वडिलांच्या बंगल्यात त्याला काही डायऱ्या सापडतात (सांकेतिक भाषेतल्या). त्या वाचून वडील कुठल्यातरी गूढ पंथाचे अनुयायी होते आणि त्या पंथाचा त्यांच्या आत्महत्येशी संबंध आहे, तसेच हा पंथ लोकांचे बळी देतो, या महत्त्वाच्या माहितीबरोबर त्या पंथाविषयी बरीच माहिती गिडियनला समजते. त्याची आई त्याच्या लहानपणी कॅन्सरने वारलेली असते. तिच्यासारखाच कॅन्सर गिडियनला लहानपणीच झालेला असतो; पण स्टोनहेंज येथील त्या पवित्र शिळांच्या स्पर्शाने पुनीत झालेल्या पाण्याने त्याचा कॅन्सर तर बरा होतोच; पण त्यानंतर तो कधीच आजारी पडत नाही. गिडियनच्या या जीवदानाच्या बदल्यात त्याच्या वडिलांना त्या गूढ पंथाचं अनुयायित्व पत्करावं लागलेलं असतं आणि ते हेंजप्रमुखही झालेले असतात. हे सगळं गिडियन मेगनला सांगतो; पण ती त्याच्यावर विश्वास ठेवायला तयार नसते.

त्याच वेळेला आणखी एक थरारक नाट्य या कथेत घडतं. लॉर्ड जोसेफ टिंबरलँड यांचा एकुलता एक मुलगा जेक आणि अमेरिकन उपराष्ट्राध्यक्षांची मुलगी केटलिन लॉक एकमेकांच्या प्रेमात पडतात. केटलिनला स्टोनहेंज येथील सूर्योदय दाखवून सरप्राइज द्यायचं, असं जेक ठरवतो. त्यासाठी एक फाऊवे कँपरव्हॅन (ज्याच्यात किचनची आणि बेडचीही सोय असते) भाड्याने घेतो. ते दोघं स्टोनहेंजला त्या शिळांजवळ पोहोचतात. त्या शिळांना स्पर्श करतात आणि त्याच वेळी त्या गूढ पंथाचे टेहळे त्यांना उचलतात. त्या पंथातील एका अनुयायाने मारलेला फटका सहन न झाल्यामुळे जेक मरतो. केटलीनला ते बळी द्यायचं ठरवतात आणि सौंदर्यवती केटलीनला निर्दयपणे

सँक्चुअरीमध्ये डांबण्यात येतं.

इथूनच एक जीवघेणा संघर्ष सुरू होतो. केटलीन आणि जेकची केसही मेगनकडे येते. त्यापूर्वी टोनी नेलर नावाचा माणूस बेपत्ता झाल्याची तक्रार त्याच्या बहिणीने नोंदवलेली असते. गिडियनच्या वडिलांची आत्महत्या, टोनीचं बेपत्ता होणं आणि केटलीन व जेकचं बेपत्ता होणं, या सगळ्याचा संबंध त्या गूढ पंथाशी आहे, याबद्दल हळूहळू मेगनची खात्री पटायला लागते. त्याला पुष्टी करणारे काही धागेदोरे तिच्या हाती येतात. गिडियनच्या म्हणण्यावर तिचा विश्वास बसतो.

तिकडे गिडियन त्या गूढ पंथात अनुयायी म्हणून दाखल होतो. त्या पंथाची दीक्षा घेतो. केटलीनचा बळी देईपर्यंत तिची काळजी घेण्याचं काम गिडियनवर सोपवण्यात येतं. गिडियन भेटेपर्यंत आपला बळी दिला जाणार आहे, हे केटलीनला माहिती नसतं. गिडियन तिला त्याची कल्पना देतो आणि तिचं मनोधैर्य उंचावण्याचा प्रयत्न करतो. तसंच केटलीनला तिथून निसटण्यासाठी मदत करायचंही कबूल करतो. दरम्यान, केटलीनच्या शोधासाठी पोलीस, सीआयडी आणि एक खासगी गुप्तहेर संघटना कसून तपास करत असतात. गिडियन आणि केटलीन तिथून निसटण्यात यशस्वी होतात का, पोलीस, सीआयडी, गुप्तहेर त्यांच्यापर्यंत पोहोचतात का, हे जाणून घेण्यासाठी 'द स्टोनहेंज लेगसी' ही कादंबरी जरूर वाचली पाहिजे.

ही कादंबरी रहस्यमय वळणं घेत पुढे सरकत राहते, गूढ पंथ, त्यांची दीक्षा देण्याची पद्धत, बळी देण्याची पद्धत, सँक्चुअरीतील गूढ वातावरण हे सगळं वाचताना अंगावर शहारे येतात. गिडियनला त्याच्या वडिलांबद्दलचं सत्य समजल्यानंतर त्याची होणारी भावनिक अवस्था, डांबलेलं असताना केटलीनच्या मनात तिच्या आई-वडिलांविषयी येणारे विचार, मेगनचा सॅमीसाठी तुटणारा जीव, आपला नवरा त्या गूढ पंथाला मिळाला आहे, हे कळल्यावर तिची झालेली तगमग, या सगळ्यांतून एक भावनाट्यही या कादंबरीत उभं राहतं. थरारनाट्य आणि भावनाट्य याचा प्रत्यय देत रहस्यमय अंगाने पुढे सरकणारी आणि वाचकाची उत्कंठा शेवटपर्यंत ताणून धरणारी ही कादंबरी आहे.

कामबख्त निंदर

नरेन्द्र मोहन

अनुवाद

यशोधरा काटकर

फाळणीचा वेदनादायी इतिहास आणि १९७५च्या आणीबाणीचा कलह यांनी अस्वस्थ करणारी मांडणी असणारं आत्मकथन

कुठे आहेस तू, निंदर?

रोज काही ना काही घडतंय.

परवा काही लोकांना जिवंत जाळण्यात आलं, काल सुरामारी झाली आणि गोळीबार....

आज पुन्हा काहीतरी दुर्घटना घडली आहे. कदाचित काही लोकांची कत्तल! जमावबंदीच्या आदेशाची कडक अंमलबजावणी केली जात आहे- 'शूट ॲट साइट!'

गडद काळोख पसरला आहे सगळीकडे. कसा बाहेर पडू? दाईही बिचारी काय करणार? कशी येणार ती?

''तिनं यायला नकार दिला आहे. मलाच जावं लागेल. तिला समजावून, काही करून बरोबर घेऊन येईन. तू काळजी करू नकोस.'' बाऊजी आईला सांगत होते. आई चिंतातुर झाली आहे. खोलीच्या कोपऱ्यात एक दिवा तेवत आहे. आईला काही आठवत होते. ठीक दोन महिन्यांपूर्वीची ती घटना. ३१ मे १९३५ रोजी बलुचिस्तानातल्या क्वेट्टा शहरात झालेला भयंकर भूकंप. धरणी जणू उलथीपालथी झाली होती, वेडीवाकडी होऊन उद्ध्वस्त झाली होती, वृक्ष मुळांपासून उखडले गेले होते आणि हजारो मृत्युमुखी पडले होते. आईचे भयभीत होऊन थरथर कापणे मला जाणवत आहे. हजारो इमारतींची धूळधाण झाली होती. त्या विध्वंसातून उंचावणारे, बोलावणारे, आक्रंदणारे ते चिमुकले हात...मला वाटले की त्या उद्ध्वस्त पार्श्वभूमीवर डोळ्यांसमोर घडणाऱ्या हिंसाचारामधून आई चालत कुठेतरी निघाली आहे.

हे स्वप्न आहे की वास्तव? हे घरातून कोण बाहेर पडतायत... मी बाऊजी? बाऊजी मी...ऊन-सावलीसारखं... हे काय घडून राहिलंय? घरातून कोण बाहेर पडलंय्? मान उंचावून बघतोय. सगळीकडे अंधारच अंधार पसरला आहे. आत-बाहेर पसरली आहे मृत्यूनंतरची गोठलेली शांतता. ''ठीक खबर मिळत नाहीये. पासष्ट लोक मारले गेले आहेत. शेकडो जखमी झालेत. हे पहिल्यांदाच घडत नाहीये; दर दोन-तीन दिवसांनी हे प्रकार होतच आहेत. कमबख्त राजकारणी अशा संधी शोधत असतात. त्यांचा ना कोणता धर्म, ना ईमान. लोकांच्या मनात विष कालवत राहणं, हेच त्यांचं काम!'' कालच बाऊजी आईला सांगत होते आणि मी गर्भातल्या अंधारातून ऐकत राहिलो होतो.

ते बाऊजीच आहेत. अंधारात घरातून बाहेर पडले आहेत. का होत

असतील अशा वाईट घटना, असा विचार करत, एक एक पाऊल जपून टाकत ते निघाले आहेत. अरे, त्यांना जोरात ठेच लागली आहे. ते पडता पडता सावरले आहेत. त्यांना आठवले, गल्ली खोदून ठेवली आहे. वाटेत खूप खड्डे आहेत. ते जीव वाचवत निघाले आहेत; पण आकाशात हा थरथराट कुठून उमटत आला आहे? कुठेतरी गोळीबार झाला आहे की कुणाचा जीव घेतला गेला आहे? अचानक एक सणसणीत आवाज भयाचे थरार उमटवत कानी आला,

''कोण आहे?''

टॉर्चचा प्रखर झोत पडला.

घाबरलेले बाऊजी जागच्या जागी खिळून उभे राहिले. दोन शिपाई झपाझप पावले उचलत त्यांच्यापाशी आले, ''कोण रे तू?'' पहिल्या शिपायाने विचारले.

''गल्लीच्या कोपऱ्यावर राहतो.'' बाऊजींनी उत्तर दिले.

''इथे काय करतोस? जमावबंदी हुकूम लागू केला आहे, माहीत नाही?'' दुसऱ्या शिपायाने दरडावले.

''माहिती आहे.'' बाऊजींनी दबक्या आवाजात उत्तर दिले.

''तुला काही भीती वाटत नाही का?''

शिपायाने रायफलचा दस्ता त्यांच्या पाठीवर दाबला. मला वाटले जणू कुणीतरी मलाच हादरवले आहे. आईची किंकाळी मला जाणवली. बाऊजी घाबरले होते. थरथर कापत ते म्हणाले, ''मला मारून टाका; पण माझ्या मुलाला जगात येऊ द्या!''

ते दोघे जण बाऊजींच्या तोंडाकडे बघतच राहिले.

''माझी पत्नी वेदनांनी तडफडत आहे. मी दाईला घेऊन यायला बाहेर पडलो आहे.'' दीनवाणे बाऊजी गयावया करू लागले.

''तुझ्यावर विश्वास कसा ठेवायचा?''

दोन्ही शिपाई बाऊजींबरोबर निघाले. त्यांनी दाईच्या घराच्या दारावर थाप दिली. घाबरलेली दाई दरवाजा अर्धवट किलकिला करत बाहेर डोकावली. भयभीत होत तिने वडिलांकडे पाहिले-

''चल.'' वडील म्हणाले.

निघावे की नाही? तिची मनःस्थिती द्विधा झाली होती.

बाऊजींचा आवाज चढला, ते जवळपास ओरडलेच, ''चल!''

पण दुसऱ्याच क्षणी त्यांचा आवाज मृदू झाला, ''घाबरू नकोस, पोलिस माझ्याबरोबर आले आहेत.''

तिचे लक्ष पोलिसांकडे गेले आणि ती वडिलांबरोबर यायला तयार झाली. मी आईच्या आत, तिच्याबरोबर आहे; पण मला असं का वाटतंय की त्या क्षणी मी बाऊजींमध्ये परिवर्तित होऊन गेलो आहे. खरं तर मी तर माझ्या जन्माच्या क्षणाची वाट बघतोय. कधी येईल तो क्षण? मी स्वप्नात आहे की त्याच्या बाहेर कुठेतरी आहे, पण मी तर कुठेच नाही.

बाऊजी दाईबरोबर पुढेपुढे चालत आहेत. पाठी बुटांची जडशीळ टाप. रात्र. अंधार. बारा वाजायचा सुमार आहे.

लाहोर आणि लाहोर कॅन्टोनमेंटच्या मध्ये वसलेल्या धर्मपुरा वस्तीत एका गल्लीतल्या शेवटच्या टोकाला असलेल्या घरात बाऊजी दाईला बरोबर घेऊन शिरले. ते खोलीच्या बाहेर थांबले. दाई आत शिरली. तिथे प्रसववेदनांनी व्याकूळ झालेली माझी आई कण्हत आहे. बाहेरून 'पकडा', 'मारा', 'कापा'च्या प्रचंड हिंस्र आरोळ्या माझ्यावर येऊन आदळत आहेत आणि आईच्या वीजप्रवाहासारख्या तेजतर्रार कळा गर्भातल्या अंधाराला भेदून मला थरकापवून टाकत आहेत. आई खूप भेदरली आहे, सारखी मला चाचपडून बघते आहे. ३० जुलै १९३५ या माझ्या जन्माच्या घडीत स्वप्न आणि दुःस्वप्न, आशा आणि दहशतीची विचित्रशी सरमिसळ झाली आहे. त्या दिवसांतल्या त्या दुर्घटना, दंगे, 'पकडा', 'मारा', 'कापा'च्या आरोळ्या, त्यानंतरच्या जमावबंदीच्या वातावरणात गडद अंधार भेदत बाहेर येत असण्याचे स्वप्न रूपे बदलत, जन्म घेतल्यापासून आजतागायत माझा पाठलाग करत राहिले आहे.

आई - श्रीमती विद्यावती, वडील - श्री. रूपलाल शर्मा. आई तिच्या आई-वडिलांनी मोठ्या कोडकौतुकाने वाढवलेली, त्यांची अतिशय लाडकी मुलगी होती. तिचा सुसंस्कृतपणा तिच्या प्रत्येक कृतीतून प्रत्ययाला येत राहायचा. कुठल्याही गोष्टीत कुरूपता, बेंगरूळपणा आलेला तिला नापसंत असे. ती प्रत्येक काम अगदी सावकाश, अतिशय व्यवस्थित करत असे. अगदी चणे खाण्यासाठीही ती चमच्याचा वापर करत असे. ती घरात सर्वांत मोठी होती. तिचा भाऊ ब्रिजेंद्र किशोर तिच्यापेक्षा दहा वर्षांनी लहान होता. त्याला ती लाडाने 'निक्का' म्हणून हाक मारीत असे. ती सडपातळ आणि उंच, सुसंस्कृत आणि मिडल् पास झालेली होती. तिचे वडील पंडित

विश्वंभरनाथ पुरंग कालव्यांच्या कार्यालयात ड्राफ्ट्समनच्या पदावर कार्यरत होते. त्या काळात सरकारी नोकरीची एक आगळीच प्रतिष्ठा असल्यामुळे, ते पार बगदादपर्यंत जाऊन आले होते. त्यांच्या या मुलीचा विवाह बटाल्याच्या एका सनातनी ब्राह्मण कुटुंबातल्या मुलाशी म्हणजे माझ्या वडिलांशी झाला. वडिलांचे आजोबा म्हणजे माझे पणजोबा पंडित बदरीदास, हे त्या काळचे मोठे समाज-सुधारक असल्याने, त्यांची ख्याती दूरवर पसरली होती. अनिष्ट सामाजिक रूढी आणि कुप्रथांच्या विरोधात ते नेहमी अविचल, ठाम उभे राहत. माझ्या वडिलांचे वडील पंडित कालिदास बटाल्याचे प्रसिद्ध ज्योतिषी होते. ते आपल्या मोठ्या मुलाला, दीनानाथला ज्योतिषी बनवण्याची इच्छा मनी बाळगून होते; पण ते सरकारी नोकरीच्या मार्गाने गेले. मग धाकट्या मुलाला, म्हणजे माझ्या वडिलांना ज्योतिषाची दीक्षा देण्यासाठी मुहूर्त ठरवण्यात आला. नेमके त्याच दिवशी वडील जोरात आजारी पडले आणि त्यांचे ज्योतिषी बनणे राहूनच गेले.

माझे वडील खूप उंच नव्हते; पण बुटकेही नव्हते. त्यांची शरीरयष्टी सुदृढ होती आणि त्यांच्या चेहऱ्यावर तेज झळकत असे. ते मॅट्रिक झाले आणि नोकरीच्या शोधात होते. तेव्हा त्यांच्या मित्रांपैकी एकाने त्यांना कराचीला बोलावून घेतले. तिथे त्याने कापसाच्या धंद्यात चांगला जम बसवला होता. वडिलांनी कराचीला जाऊन, तिथला सगळा कारभार खूप हुशारी आणि मेहनतीने सांभाळला. त्या काळात माझे मोठे बंधू मदनमोहन यांचा जन्म बटाला इथे झाला. मग वडील आले व पत्नी आणि मुलाला कराचीला घेऊन गेले. त्यांना कराचीत कंपनीतर्फे एक आलिशान घर आणि हजार रुपये पगार, जो आजच्या हिशोबाने एक लाख रुपये होईल, दिला जात होता. बाऊजींसमवेत संपूर्ण परिवारासाठी तो खरोखरीच एक सोनेरी कालखंड होता, पण पुढे दिवस फिरले, आणि बघता बघता सगळा डाव विस्कटून गेला. कंपनीचा एक विभाग सट्टेबाजीत गुंतलेला होता. जोपर्यंत नफा मिळत होता तोपर्यंत सगळे ठीक होते; पण जशी घसरण सुरू झाली, तशी तोट्यात चाललेली परिस्थिती सांभाळणे कठीण होत गेले. कदाचित पहाडाइतक्या उंचीवरून पोचून तितक्याच खोल दरीत कोसळण्याला उत्थान आणि पतन म्हणत असावेत. बीजी आणि बाऊजींना त्या काळात किती निराशा आणि हतबलतेला तोंड द्यावे लागले असेल, त्याचा अंदाज करणे खरोखरी कठीण आहे.

अगदी असहाय्य अवस्थेत ते बटाल्याला परतले. बाऊजी कामधंद्याच्या

शोधात निघत; पण निराश होऊन परतत. आजोबांचा स्वभाव अगदी निःसंग, निभ्रांत, तर आजीचा अतिशय कडक. बाऊजी आणि बीजींना लाजेची टोचणी आतून छळत होती, त्यात भर म्हणून उपेक्षा, अपमान आणि मानहानीही सहन करावी लागत होती. त्याच काळात माझ्या भावाचा, जगमोहनचा जन्म झाला. मुलाचा जन्म आई-वडिलांच्या आयुष्यात विविधरंगी असीम जगाचे दरवाजे उघडतो; पण हेही खरे आहे की बऱ्याच वेळा परिस्थितीतून उद्‌भवणाऱ्या मानसिक ओढाताणी आणि क्लेशही त्याच्याशी जुळत जातात. बीजी, बाऊजी तेव्हा आनंद आणि संतापाच्या संमिश्र अनुभूतीतून जात होते. परिस्थितीमुळे आमच्या आनंदाला, स्वास्थ्याला ग्रहण लागले होते, त्यावर कोणताच इलाज सापडत नव्हता.

त्या कठीण परिस्थितीत बीजींच्या वडिलांनी बाऊजींना आपल्याजवळ चविंडा देवीवाल्या गावात राहायला बोलावून घेतले, ही एक खूप चांगली गोष्ट झाली. या नव्या वातावरणात त्यांना थोडा सुटकेचा श्वास, थोडा आराम मिळाला. बीजींच्या वडिलांचे एक अविवाहित भाऊ तेव्हा बिकानेरच्या एका शाळेत हेडमास्तर म्हणून कार्यरत होते. त्यांनी बाऊजींना त्या शाळेत शिक्षकाची नोकरी देऊन बोलावून घेतले, तेव्हा ते कुटुंबासह तिकडे रवाना झाले. वाईट दिवसांचा फेरा पालटला. ते तिथे गणिताचे शिक्षक म्हणून कामावर रुजू झाले आणि त्यांचा नावलौकिक तिथे पसरू लागला. तिथे माझे मोठे बंधू ब्रिजमोहन यांचा जन्म झाला. रेताड वाळवंटातली वादळे, वाळूच्या टेकड्यांवर उमटत्या-मिटत्या खुणा, पाण्याचे दुर्भिक्ष आणि वाळवंटातल्या आयुष्यातल्या अनेक प्रसंगांबद्दल ते नेहमी सांगत असत. बिकानेर सोडल्यानंतर काही काळ त्यांनी डुंगरगडमध्येही शिक्षकाची नोकरी केली. त्या कालखंडातल्या सुख-दुःखाच्या कहाण्या-आत्मकथा ते नंतरही सांगत असत. काही वर्षांपूर्वी कुठल्याशा चर्चासत्राच्या निमित्ताने बिकानेर आणि डुंगरगडला जायची संधी मिळाली तेव्हा त्यांच्याकडून ऐकलेल्या त्या सगळ्या कहाण्या माझ्या स्मृतिपटलावर एका चित्रपटाच्या रिळाप्रमाणे उलगडत गेल्या होत्या.

बिकानेर आणि डुंगरगड का सोडले असेल त्यांनी? कोणता दबाव वा तणाव त्यांना त्रास देत होता, याबाबत माझ्या मनात वा हृदयात कोणतेही प्रत्युत्तर नाही. कदाचित परिस्थिती अशा प्रकारे अचानक बदलून गेली असावी, की ती आटोक्यात आणणे त्यांना शक्य झाले नसावे. ते सरगोध्याला का गेले, याबद्दलही माझ्यापाशी कोणतीच अटकळ नाही.

असेही असेल की, बीजींच्या वडिलांमार्फत त्यांना तिथे कोणते तरी काम मिळाले असावे. माझ्या लक्षात एवढे मात्र आहे, की माझ्याहून मोठ्या जोगिन्दरचा जन्म तिथे झाला. जेमतेम दोन वर्षे तिथे राहून ते बटाल्याला परत आले. कराची सोडल्यानंतर त्यांच्या आयुष्यात दुर्दैवाचा जो फेरा सुरू झाला तो कधी संपलाच नाही. तात्पुरत्या, हंगामी नोकऱ्यांमध्ये ते नेहमीच हेलकावत, धक्के खात राहिले; पण तशा कालखंडातदेखील आईचा धीर, वडिलांची जिजीविषा आणि छोट्या-छोट्या गोष्टींतून आनंद घेण्याच्या स्वभावामुळे परिस्थितीशी झगडण्याचे त्यांचे बळ कधी कमी झाले नाही.

बटाला ते लाहोर. बटाल्यात राहणे त्यांना इतके कठीण झाले होते का? बाऊजींचे भाऊ दीनानाथ, जे तेव्हा लाहोरमध्ये वास्तव्याला होते, त्यांनी काही लालूच दाखवून त्यांना बटाल्याच्या घरापासून दूर करण्याचा प्रयत्न केला होता का? लाहोरमध्ये बाऊजींचे दोन बालमित्र - अब्दुल मजीद खान आणि नाथामल राहत होते, त्यामुळे तर त्यांनी तिथे जाण्याचा निर्णय घेतला नसेल? काहीही असो, बाऊजी कितीही विवश झाले असोत, एखाद्या अद्‌भुतासारख्या भासणाऱ्या लाहोरबद्दलचे आकर्षण त्यांच्याही मनात दडलेले असणार होते. कॉलेजांचे शहर लाहोर, सभ्यता, संस्कृती, कला, सिनेमा आणि शिक्षणाचे केंद्र लाहोर, अनारकली बाजार, रावीच्या पाण्यात आपल्या इतिहासाची उमटती-मिटती, सजलेली प्रतिबिंबे बघणाऱ्या लाहोरला नेहमीच एक चैतन्यमय व्यक्तिमत्त्व लाभलेले असते. म्हणून तर असे म्हटले जायचे की, 'जिस लाहौर नही वेख्या ओ जन्मया ही नई' बाऊजी डोळ्यांमध्ये स्वप्ने घेऊन, बटाल्यासारखे छोटे गाव सोडून अशा एका शहरात आले होते खरे; पण इथे ते वास्तवाच्या कठोर भिंतींशी टकरा देत रक्तबंबाळ होत राहिले.

इकडे माझा जन्म झाला, तिकडे आजोबांचे निधन झाले. मी माझ्या आई-वडिलांचे पाचवे मूल होतो, ज्याला ते प्रेमाने 'लल्लू लाल', 'लंठराज', 'लालबुझक्कड'... म्हणत असत. मोठ्या भावडांनी 'ल, ल,ल, ला....' करून लहानपणी माझी खूप थट्टा उडवली; पण माझ्या लेखी त्या एकाहून एक सरस अशा प्रेमभऱ्या पदव्या होत्या. 'ल' च्या त्या उच्चतम (लाल-पालांनी भारतीय राजकारणात आपले मानदंड स्थापित केले, हे सर्वज्ञात आहेच!) पदव्यांपुढे माझ्या परिश्रमपूर्वक अभ्यास करून मिळवलेल्या, विद्यापीठाने प्रदान केलेल्या पीएच.डी.च्या पदवीचे मला काहीच अप्रूप वाटत

नाही. 'ल, ल, ल,ला' वाल्या या पदव्या पुढे मी माझ्या मुलांमध्ये, नंतर नातवंडांमध्ये वाटल्या आणि मुलांनीही त्या जणू दुर्मिळ, अमूल्य ठेवा असल्यासारख्या मोठ्या आदराने स्वीकारल्या.

मी बऱ्याचदा विचारात पडतो की, माझ्या लिखाणाचे उगमस्थान नेमके कुठे आहे? वडिलांमध्ये लिखाणाची प्रवृत्ती नक्कीच होती; पण ती दबून गेली, परिस्थितीच्या रेट्यापायी ती फुलू, बहरू शकली नाही. आजोबा आणि पणजोबांबद्दल वडील जे काही सांगत असत त्यातून त्यांच्यामध्ये सर्जनशील मानसिकता असण्याच्या कोणत्याही खुणा दिसत नाहीत. मला वाटते की, माझ्या पार्श्वभूमीमध्ये असे काहीतरी असले पाहिजे जे मला लिहिण्यासाठी नेहमी प्रवृत्त करत राहिले; पण ते नेमके काय आहे त्याची मला अजूनतरी ओळख पटलेली नाही. बऱ्याच वेळा एक उष्ण रेषा वर चढत कोसळताना दिसते, एक बिंब चमकते आणि लुप्त होऊन जाते. याला सामूहिक, जातीय आणि कौटुंबिक नेणिवांच्या अंधाऱ्या समुद्रातून 'एक बूँद सहसा उछली' असे म्हणता येईल. पणजोबांच्या मागे बघताना मात्र एका अंधारलेल्या समुद्राच्या लाटांच्या गर्जना ऐकू येतात; पण नजरेला काही दिसत नाही. असेही असेल की, त्या काळ्यामिट्ट समुद्रात उसळलेल्या काही लाटा माझ्या कळत-नकळत सुप्त मनातल्या अंधारात येऊन कोसळल्या आणि सर्जनात्मक आकार व दृश्यांमध्ये परिवर्तित होत गेल्या असाव्यात. काय होत गेले असेल?

रूढी-परंपरांशी झगडणारा, टक्कर देणारा माझा सनातनी हिंदू परिवार. पूजाअर्चेबद्दल अविचल श्रद्धेने ओतप्रोत भरलेला. थोडा खुला, थोडा बंदिस्त, थोडा पुराणमतवादी, थोडा उदार.

मी तेव्हा असेन तीन वर्षांचा. बीजींना म्हणालो, ''पीतांबर नेसलेले, पिवळ्या रथावर स्वार झालेले कृष्णजी माझ्या स्वप्नात आले होते. ते हसत हसत म्हणत होते, 'पिवळ्या रंगाचा हलवा खाऊ घाल ना!' बाऊजी, बीजी, भाऊ हसू लागले. बीजी माझे लाड करत म्हणाल्या, ''निंदर ठीकच तर म्हणतोय, याच्या जिभेवर सरस्वतीचा वास आहे. पीतांबर नेसून पिवळ्या रथावर स्वार झालेल्या कृष्णासाठी मी लगेच पिवळ्या रंगाचा हलवा बनवते बरं!''



अपूर्व, अलौकिक, एकमेव...

यशोधरा काटकर

सालस सुलोचनाबाई,
मनस्वी प्रिया तेंडुलकर,
दिलदार रणजित देसाई...
यशोधरा काटकरांच्या ललितरम्य शैलीतून
उतरलेला व्यक्तिचित्रणात्मक शब्दसाज...

'अपूर्व, अलौकिक, एकमेव...' हा व्यक्तिचित्रसंग्रह आहे. यशोधरा काटकर यांच्या कुटुंबातील आणि काही कारणाने त्यांच्या जीवनात आलेल्या व्यक्तींची चित्रे त्यांनी रेखाटली आहेत.

'घर तिघींचे' या लेखात त्यांच्या तीन आज्यांची (लीलाबाई, सरलाबाई, बकुळाबाई) व्यक्तिचित्रे त्यांनी रेखाटली आहेत. या तिघी चित्रतपस्वी भालजी पेंढारकर यांच्या पत्नी. त्यांपैकी लीलाबाईंनी मूकपटात काम केलं होतं, नंतर काही बोलपटांतही त्या झळकल्या होत्या. या तिघींचे स्वभाव, त्यांचे परस्पर संबंध आणि भालजींविषयी या तिघींच्या मनात असलेली अपार निष्ठा, या तिघींची शेजारी शेजारी असलेली तीन घरं आणि यशोधराताईंनी त्या तिघींबरोबर व्यतीत केलेला बालपणीचा काही काळ याचं चित्रण या लेखात केलं गेलं आहे.

'आवडती' हा लेख आहे ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना यांच्यावर. एवढ्या नामवंत अभिनेत्री असूनही सुलोचनाबाई माणूस म्हणून किती मोठ्या आहेत, याचं दर्शन या लेखातून घडतं. अभिनेत्री, आई, सासू, आजी, पणजी, आत्या, शिष्या, कुटुंबप्रमुख असे सुलोचनाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पदर या लेखातून उलगडतात.

'मातीतले पाय' या लेखातून यशोधराताई भेट करून देतात गोव्यातील समृद्धी केरकर या दहा वर्षाच्या कवयित्रीची. तिच्या कवितेतील निसर्गाचं भान, अभिजातता, परिपक्वता यावरही त्या भाष्य करतात.

'गुड बाय प्रिया' हा लेख केंद्रित आहे अभिनेत्री-लेखिका प्रिया तेंडुलकर यांच्यावर. प्रिया तेंडुलकरांचं आणि यशोधराताईंचं आगळं मैत्र आणि त्यातून उलगडत गेलेले प्रिया तेंडुलकर यांच्या स्वभावाचे विविध पैलू या लेखातून समोर येतात.

'ते तिघे – पप्पा, पपा, दादा आणि मी' या लेखातून यशोधराताईंनी त्यांचे वडील नरेंद्र काटकर, सासरे गजानन शंकरराव भोसले आणि रणजित देसाई यांची शब्दचित्रं रेखाटली आहेत. या तिघांचे स्वभावविशेष रेखाटून, या तिघांचा त्यांच्या जीवनावर कसा प्रभाव पडला याचं चित्रण या लेखात केलं गेलं आहे.

'आमचे डॉक्टर' या लेखातून प्रकाश टाकला आहे डॉ. काशिनाथ

घाणेकर यांच्या व्यक्तिमत्त्वावर. एक कलावंत म्हणून डॉक्टरांचं श्रेष्ठत्व आणि माणूस म्हणून जगतानाचे त्यांचे स्वभावविशेष यावर हा लेख भाष्य करतो.

राही अनिल बर्वे या अतिसंवेदनशील मुलाच्या अतिवास्तववादी कथाविश्वातून त्याची ओळख यशोधराताईंनी करून दिली आहे. त्याच्या मनोव्यापारांतून, चिंतनातून साकारलेली ही कथा जी. ए. कुलकर्णींच्या कथेची आठवण करून देणारी...पण तरीही त्याची स्वतःची अशी.

'सख्खे शेजारी' या लेखातून शेजारी म्हणून अभिनेता प्रशांत दामले यांच्या कुटुंबाशी यशोधराताईंच्या जुळलेल्या ऋणानुबंधाचं दर्शन घडतं आणि त्या ऋणानुबंधातून प्रशांत दामले आणि त्यांची पत्नी गौरी (आऊ) यांचं व्यक्तिमत्त्व उलगडत जातं.

'असामान्य' जयशंकर दानवे' या लेखात जयशंकर दानवे यांचं कलावंत आणि माणूस म्हणून असलेलं श्रेष्ठत्व अधोरेखित केलं आहे.

'निर्मलाबाई, यशोधरा आणि यशोधराबाई' हा लेख निर्मला देशपांडे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, साहित्याचा वेध घेणारा, त्याचबरोबर निर्मलाबाईंच्या कन्येशी, यशोधराशी जुळलेल्या स्नेहबंधाचं दर्शन घडविणारा.

'इन्फिनिट' हा लेख ऐजाझ या मनस्वी, कलंदर चित्रकाराची ओळख करून देतो. स्वतःच्या भावाला किडनीदान करणारा एजाझ 'एकांतप्रिय' होता. शांतपणे मृत्यूला कवटाळणाऱ्या एजाझच्या सहवासात अवतीभवतीच्या लोकांना किती आंतरिक समृद्धी प्राप्त झाली होती, याचा सुखद प्रत्यय देणारा हा लेख आहे.

'आईबद्दल लिहिताना...' हा लेख अर्थातच यशोधरा काटकर यांच्या आई माधवी देसाई यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारा आहे. जीवनाच्या उत्तरार्धातील त्यांचं गोव्यातील वास्तव्य, त्यादरम्यान त्यांच्याकडून झालेली साहित्यनिर्मिती, त्या प्रदेशाशी जुळलेले त्यांचे सामाजिक आणि आंतरिक भावबंध याचं या लेखातून प्राधान्याने दर्शन घडतं.

◆

नवी संहिता... नवा आशय...

अमेरिकेचा
न सांगितला गेलेला
संक्षिप्त इतिहास

ऑलिव्हर स्टोन । पीटर कुझनिक

अनुवाद - **प्रशांत तळणीकर**

जागतिक महासत्ता म्हणून मिरवणाऱ्या अमेरिकेच्या इतिहासाची काळी बाजू मांडणारं, अज्ञात इतिहासाची पोलखोल करणारं पुस्तक

किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

नवी संहिता... नवा आशय...



माइंड
मास्टर

विश्वनाथन आनंद

अनुवाद - **दीपक कुळकर्णी**

अ पिअरलेस एम्बेसिडर ऑफ द चेस, ६४ घरांचा राजा, विश्वनाथन आनंद... लहानग्या 'विशी'पासून ते पहिल्या आशियाई विश्वविजेत्याच्या जडणघडणीतील अनेक टप्पे उलगडत जाणारं, बुद्धिबळाच्या पटाइतकंच गुंतवून टाकणारं आत्मकथन...

किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध



गुंतवणूकभान

गुंतवणूकदारांचं मानसशास्त्र

अतुल कहाते

पैशाला द्या पैशाचं मोल,
निगुतीने सोडवा
गुंतवणुकीचा झोल...
गुंतवणुकीचा मार्गदर्शक!

झटपट आणि विनाकष्ट पैसे कमावण्याच्या नादात अनेक लोक लॉटरीची तिकिटं काढत असतात. कदाचित सुशिक्षित लोकांमध्ये लॉटरीची तिकिटं काढण्याचं प्रमाण कमी असेल; पण ते दुर्लक्षणीय नक्कीच नसावं. सहजपणे आपल्या खिशात मोठी रक्कम येणार असेल, तर त्यासाठी प्रयत्न का करू नयेत, असा विचार यामागे तर असतोच; पण हे प्रयत्न म्हणजे फक्त एका दुकानात जाऊन काही रुपये खर्च करून तिकिटं विकत घेणं इतपतच असल्यामुळे अनेक जण त्याला भुलतात. लॉटरीची तिकिटं काढण्याची ही सवय व्यसनात कधी बदलते, हे अनेकांना समजतसुद्धा नाही. शेअर बाजारात गुंतवणूक करत असताना अनेक जणांची अवस्था लॉटरीची तिकिटं काढणाऱ्या लोकांसारखीच असते, हे आपण नीटपणे समजून घेतलं, की आपल्या मनातले अनेक प्रश्न आपोआप सुटतील.

खूप पैसे मिळाल्यावर माणसाला अर्थातच प्रचंड आनंद होतो. यामधला महत्त्वाचा पण फारसा माहीत नसलेला भाग म्हणजे प्रत्यक्षात पैसे हातात आल्यावर माणसाला जितका आनंद होतो त्यापेक्षा त्यापूर्वी पैसे मिळणार या उत्सुकतेपोटी माणसाला वाटत असलेला आनंद खूप जास्त असतो. अर्थातच अनेक वेगवेगळ्या सुखांच्या संवेदनांच्या बाबतीतसुद्धा असंच घडतं, असं मानसशास्त्रज्ञ म्हणतात. म्हणजेच आपल्याला हवीहवीशी असलेली एखादी गोष्ट घडणार या कल्पनेनं आपलं मन सुखावतं; पण प्रत्यक्षात ती गोष्ट घडल्यावर आपण आणखी आनंदी होण्याऐवजी आपला आनंद चक्क ओसरून जातो. यामागे अर्थातच आपल्या मेंदूतल्या 'सिस्टिम १' प्रकारच्या यंत्रणेला भविष्यात मिळणाऱ्या आनंदाची चाहूल लागणं हे मुख्य कारण असतं. यामुळे आपलं मन चांगल्या अर्थानं बेचैन होतं आणि आपल्याला लवकरच मिळणाऱ्या नफ्याकडे आपली नजर लागून राहते. हा नफा हाती पडला रे पडला की आपल्या मेंदूतली 'सिस्टिम १' प्रकारची यंत्रणा पार खूश होते; पण त्याचबरोबर ती शांतही होते आणि आपल्या आनंदावर विरजण पडल्यासारखं होतं.

सुप्रसिद्ध लेखक मार्क ट्वेन यानं पैशांशी संबंधित असलेल्या आपल्या या मानसिकतेविषयी स्वतःला आलेल्या अनुभवाविषयी लिहिलं आहे. आपली मानसिकताही अशाच प्रकारची असल्यामुळे आपण या अनुभवाशी एकदम सहमत असू. १८६२ मध्ये तरुण मार्क ट्वेन आणि त्याचा एक मित्र यांना अमेरिकेच्या नेवाडा राज्यामधल्या चांदीच्या खाणीचा अचानकपणे शोध

लागला. यामुळे आपण प्रचंड श्रीमंत होणार अशा विचारापोटी ट्वेनला रात्रभर अजिबात झोप लागली नाही. जणू काही आपल्या शरीराला वीजपुरवठा करणारी एखादी बॅटरीच जोडलेली असावी, तसे आपण त्यानंतरच्या रात्री चुळबुळ करत राहिलो, असं त्याला वाटलं. सॅनफ्रान्सिस्कोमध्ये दोन एकरांची जमीन विकत घेणं, युरोपच्या तीन वर्षांच्या सहलीवर जाणं अशा अनेक गोष्टी करताना आपल्याला किती मजा येईल, अशी स्वप्नं त्यानं बघितली. मात्र एका तांत्रिक कारणामुळे ट्वेन आणि त्याचा मित्र यांचं कोट्यधीश व्हायचं स्वप्न लवकरच भंगलं, तेव्हा झालेलं दुःख तसंच त्यापूर्वीची हुरहुर ट्वेन आयुष्यभर विसरू शकला नाही. नंतर आपल्या एका कथेत ट्वेननं अशाच प्रसंगाचं बहारदार वर्णनही केलं. कहर म्हणजे भरपूर पैसे कमावण्याच्या संदर्भात अशा प्रकारचा एक अनुभव येऊनसुद्धा ट्वेननं नाउमेद न होता आयुष्यभर त्यासाठी धडपड केली. अनेक हास्यास्पद आणि धोकादायक उद्योगांमध्ये/प्रकल्पांमध्ये पैसे ओतून त्यानं आपले हात वारंवार पोळून घेतले. यात खडूचा वापर करून छपाई, तलम कपड्यांवर फोटोची प्रत उमटवण्यासाठीचं यंत्र, आरोग्य सुधारण्यासाठीची पावडर, किचकट छपाईयंत्र, नवलाईपूर्ण कात्री अशा अनेक गोष्टींचा समावेश होता. खरं म्हणजे ट्वेनची आर्थिक परिस्थिती आधीच चांगली होती. त्याच्या बुद्धिमत्तेविषयी तर कुणी शंका घेण्याचा प्रश्नच नव्हता. असं असूनसुद्धा त्यानं या सगळ्या गोंधळामध्ये आपलं नुकसान करून घेण्यामागचं एकमेव कारण म्हणजे, कुठल्याही माणसाला वाटतं त्याप्रमाणेच आणखी पैसे कमावण्याची शक्यता असलेली झिंग त्याच्याही मेंदूला सुखावत होती. या भावनेपोटी तो हे सगळे उद्योग करत राहिला. चांदीच्या खाणीचा प्रसंग बहुधा त्याच्या मनात वारंवार घिरट्या घालायचा आणि दर वेळी आता या खेपेला तरी आपल्याला यश नक्कीच लाभेल, असं त्याच्या मेंदूमधल्या 'सिस्टिम १' प्रकारच्या यंत्रणेचं मत व्हायचं. त्यामुळे चक्क नाइलाजापोटी तो या नवनव्या प्रकल्पांमध्ये गुंतत राहायचा. याचा परिणाम म्हणजे अनेकदा तो श्रीमंती ते दिवाळखोरी आणि पुन्हा श्रीमंती अशा चक्रामधून फिरत राहिला.

आपल्याला भविष्यात होऊ घातलेल्या चांगल्या घटनांविषयी वाटत असलेल्या आशावादामुळे एक प्रकारची झिंग चढते आणि त्यातून आपल्या मनात लोभ निर्माण होतो. याची अनेक ठळक उदाहरणं गुंतवणुकीच्या संदर्भात बघायला मिळाली आहेत. ८ सप्टेंबर १९९९ या दिवशी सेलेरा

जिनॉमिक्स ग्रुप नावाच्या कंपनीनं माणसाच्या शरीरामधल्या पेशींमध्ये आढळणाऱ्या वेगवेगळ्या जीन्सचा अतिसूक्ष्म पातळीवर अभ्यास करत असल्याची घोषणा केली. माणसाच्या शरीरातल्या डीएनएचं पृथक्करण यामुळे सहजपणे शक्य होईल, असं मत अभ्यासकांनी व्यक्त केलं. साहजिकच जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ही प्रचंड मोठी मजल ठरेल, असं सगळ्यांना वाटलं. यामुळे सेलेरा कंपनीच्या शेअर्सची खरेदी करण्यासाठी एकच झुंबड उडाली आणि एका शेअरची किंमत १७.४१ डॉलर्सवरून २००० सालच्या सुरुवातीला थेट २४४ डॉलर्सवर जाऊन पोहोचली. २६ जून २००० या दिवशी अमेरिकी राष्ट्रपती जॉर्ज डब्ल्यू. बुश आणि ब्रिटिश पंतप्रधान टोनी ब्लेअर यांच्या उपस्थितीत सेलेरा कंपनीचा प्रमुख शास्त्रज्ञ जे क्रेग व्हेंटर यानं आपला प्रकल्प यशस्वी ठरला असल्यामुळे 'एक लाख वर्षांच्या मानवी अस्तित्वाच्या कालखंडामधला हा ऐतिहासिक क्षण आहे' असं विधान केलं. म्हणजेच सेलेरा कंपनीनं पूर्वी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरला होता. अशा वेळी कंपनीच्या शेअरच्या किमतीत काय बदल झाले असावेत? त्याच दिवशी शेअरची किंमत चक्क १०.२०टक्के इतकी घसरली आणि त्याच्या पुढच्या दिवशी त्यात आणखी १२.७०टक्के इतकी घट झाली! सेलेरा कंपनीचं भविष्य धोक्यात येण्यासारखी किंवा तिची प्रतिमा खराब होण्याजोगी एकही घटना घडली नव्हती. उलट कंपनीनं जग बदलून टाकणारा प्रकल्प मोठ्या जिद्दीनं पूर्ण करून दाखवला होता. असं असूनही गुंतवणूकदारांनी या कंपनीच्या शेअर्सच्या विक्रीचा मारा का केला असावा? अर्थातच बहुधा एखादी गोष्ट घडणार म्हटल्यावर त्याविषयी वाटत असलेली उत्कंठा प्रत्यक्षात ती घटना घडल्यावर पार ओसरून जाण्याचा हा प्रकार असावा. तसंच आता या कंपनीच्या बाबतीत जे काही चांगलं घडायचं आहे ते आता घडलेलं आहे आणि तिचं भविष्य तिच्या वर्तमानाइतकं किंवा भूतकाळाइतकं रोमांचक नसणार, असा निराशावादही याला कारणीभूत ठरला असावा. जे अपेक्षित असतं, ते घडल्यावर आता कुठल्या औत्सुक्यापोटी नव्यानं गुंतवणूक करायची, हा प्रश्न गुंतवणूकदारांना नेहमीच भेडसावतो आणि त्यामुळे अशा प्रकारे विक्रीचा मारा सुरू होतो. २००६ सालापर्यंत या कंपनीच्या शेअरची किंमत तिच्या उच्चांकी पातळीवरून तब्बल ९०टक्के घसरून फक्त १४ डॉलर्सवर आली. यावरून निव्वळ लोकांच्या लोभापोटी ज्या कंपनीच्या शेअरची किंमत वाढत जाते, अशा

कंपनीमध्ये गुंतवणूक करणं किती धोक्याचं असतं, हे आपल्या लक्षात येईल.

२०१३ सालच्या अखेरच्या काळापासून २०१४ सालच्या सुरुवातीपर्यंत नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारतात भारतीय जनता पक्षाचं सरकार येणार अशी अपेक्षा अनेकांना होती. त्यामुळे त्यांनी शेअर बाजारात गुंतवणूक सुरू केली. प्रत्यक्ष निकाल हाती आले तेव्हा मोठमोठ्या विश्लेषकांचं हसं होईल इतक्या प्रचंड बहुमतानं मोदी यांचं सरकार आलं. खरं म्हणजे यामुळे निकालाच्या दिवशी शेअर बाजार प्रचंड वेगानं वर जायला हवा होता; पण प्रत्यक्षात सुरुवातीला तो वेगानं वर चढल्यावर लगेचच त्यामधला जोष ओसरला आणि तो पुन्हा आधीच्या पातळीहून ४-५टक्के वरच्या पातळीवर बंद झाला. म्हणजेच अपेक्षापूर्तीनंतर गुंतवणूकदारांचा उत्साह मावळला.

गुंतवणूकदार अमुक गोष्ट घडेल अशी अपेक्षा ठेवून अनेकदा गुंतवणूक करतात आणि त्यांच्या अपेक्षांच्या तुलनेत अगदी थोडा जरी खराब निकाल प्रत्यक्षात हाती आला तरी नैराश्यापोटी ते विक्रीचा मारा सुरू करतात, असा दुसराही एक मुद्दा वारंवार दिसून येतो. उदाहरणार्थ, एखाद्या कंपनीला एखाद्या तिमाहीत २५० कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळणं अपेक्षित आहे असं विश्लेषकांचं मत असताना, हा आकडा थोडा कमी म्हणजे २४० कोटी रुपये असेल तरी अचानकपणे गुंतवणूकदार आपली अपेक्षापूर्ती न झाल्याच्या कारणावरून शेअर्सची जोरदार विक्री करू शकतात. खरं म्हणजे अशा थोड्या फरकानं कंपनीच्या तेव्हाच्या कामगिरीत किंवा भवितव्यात तसा काहीच फरक पडलेला नसतो; पण तितकीशी निराशाही गुंतवणूकदारांना कधीकधी पुरते.

गुंतवणूकदारांनी सातत्यानं शेअर्सची खरेदी-विक्री करण्यासाठी प्रोत्साहित व्हावं यासाठी शेअर दलालांची कार्यालयं तसंच टीव्हीवरचे बिझिनेस चॅनेल्स यांच्यावर शेअर्सच्या ताज्या किमती कायम झळकत असतात. जसं, अनेक ठिकाणी गेम्स खेळण्यासाठीची मशिन्स ही लोकांची पटकन नजर पडावी आणि त्यांना त्या गेम्स खेळण्याचा मोह व्हावा अशा ठिकाणी ठेवलेली असतात; अगदी तसंच. गुंतवणूकदारांना अगदी तातडीनं आपण आपल्याकडच्या शेअर्सच्या विक्रीच्या संदर्भात किंवा आपल्याकडे नसलेल्या शेअर्सच्या खरेदीच्या संदर्भात काहीतरी केलं पाहिजे असं वाटायला लावणारी ही परिस्थिती असते.

गुंतवणूकदारांना मोहात पाडणाऱ्या लोभाच्या संदर्भातला आणखी एक महत्त्वाचा मुद्दा हा मानवी मनाच्या दुसऱ्या एका मूलभूत भावनेशी संबंधित आहे. आपल्याला कुठल्याही गोष्टीमध्ये आपलं नुकसान होईल अशी शक्यता वाटत असताना ते नुकसान न होता मिळालेल्या फायद्याचं अप्रूप, हे फायदा होणार हे माहीत असताना मिळालेल्या फायद्यापेक्षा जास्त असतं. म्हणजेच संभाव्य नुकसानाऐवजी झालेला फायदा हा आपल्याला जास्त सुखावणारा असतो. गुंतवणुकीच्या संदर्भातही हेच घडतं. गुंतवणुकीत यश मिळवण्याचा खात्रीशीर मार्ग म्हणजे गुंतवणूक करून दीर्घ काळ काहीच न करणं हा असतो; पण त्याऐवजी संभाव्य धोक्यांचा सामना करत करत अधूनमधून ते धोके टाळत मिळणारं यश आपल्या मनाला जास्त सुख देतं. साहजिकच आपण आपल्या नकळत विनाकारण थोडेफार धोके पत्करून यश मिळवण्यासाठी धडपडतो.

यातून आपण घ्यायचा बोध

- *एकाच गोष्टीची खात्री बाळगणं :* शेअर बाजारामध्ये आपल्याला फक्त एकाच गोष्टीची खात्री वाटते, ती म्हणजे तिथं कुठल्याच गोष्टीची खात्री कधीच नसते! आपल्या मनात असलेला लोभ हा शेअर बाजारात नेहमीच इतर सगळ्या भावनांवर मात करतो. त्यामुळे 'गुंतवणूक दुप्पट होईल', 'आता या शेअर्सच्या किमती गगनाला भिडणार आहेत' अशांसारख्या गोष्टी ऐकून आपलं मन लगेचच मोहात पडतं आणि आपण आपल्याला गोत्यात आणणारे व्यवहार करून बसतो आणि नंतर त्याविषयी पश्चात्ताप करतो. हे टाळण्यासाठीचा सोपा उपाय म्हणून आपण एक साधा प्रश्न स्वतःला विचारू शकतो. जर अमुकअमुक स्वरूपाची गुंतवणूक इतकी लाभदायी आणि जगावेगळी असेल, तर ती फक्त आपल्याच वाट्याला कशी काय आली असेल?
- *लॉटरी दोन वेळा लागत नसते :* जर आपल्याला कधी गुंतवणुकीत मोठं यश लाभलेलं असेल, तर या यशाची एक प्रकारची चटक आपल्या मेंदूला लागते आणि आपण सातत्यानं या यशाची वाट नव्यानं बघायला लागतो. तसंच आपल्याला आपल्या यश मिळवण्याच्या कौशल्याविषयी अचानकपणे खात्री वाटायला लागते. प्रत्यक्षात बहुतेक करून आपल्याला पूर्वी मिळालेलं यश हे आपल्या कुठल्याही खास कौशल्यामुळे मिळालेलं नसतं, तर ते तात्कालिक

परिस्थितीमुळे मिळालेलं असण्याची दाट शक्यता असते. म्हणूनच लॉटरी दोन वेळा लागत नसते, हे लक्षात घेऊन आपण अत्यंत सावधपणे गुंतवणुकीच्या वाटेवरून मार्गक्रमण केलं पाहिजे.

- *थ्रिल' कसं मिळवायचं? :* दर वेळी गुंतवणूक करत असताना फक्त दीर्घकालीन मुद्द्यांचा विचार केला आणि वारंवार खरेदी-विक्रीचे व्यवहार केले नाहीत तर अर्थातच आपला नफा होण्याची शक्यता दाट असते; पण यातून आपल्या वाट्याला कसलंच 'थ्रिल' येत नाही. साहजिकच अशा प्रकारच्या गुंतवणुकीचा कंटाळा अनेक जणांना येऊ शकतो आणि त्यामुळे ते गुंतवणुकीच्या माध्यमातून थ्रिल मिळवण्यासाठी प्रयत्न करतात. अर्थातच यातून त्यांचं मोठं नुकसान होऊ शकतं. हे टाळण्यासाठीचा एक सोपा उपाय म्हणजे अशा प्रकारचं थ्रिल अनुभवण्यासाठी आपण आपल्या गुंतवणुकीच्या एकूण रकमेपैकी थोडा हिस्सा वेगळा काढून ठेवावा. ही रक्कम थोडीच असावी आणि काहीही झालं तरी ती अजिबात वाढवू नये. ही रक्कम धोकादायक स्वरूपाच्या आणि आपल्याला हवं असलेलं थ्रिल मिळवून देणाऱ्या व्यवहारासाठी वापरावी. उरलेली मुख्य रक्कम आपण शांतपणे, विचारपूर्वकरीत्या दीर्घ मुदतीसाठी गुंतवावी.
- *आपल्या भावना ताब्यात ठेवणं :* गुंतवणुकीशी संबंधित असलेल्या आपल्या भावना ताब्यात ठेवण्यासाठीचा एक सोपा मार्ग म्हणजे आपली भीती आणि आपल्याला होत असलेला मोह या गोष्टी दूर ठेवण्याचं असतं. यासाठी आपल्या गुंतवणुकीची सध्याची परिस्थिती काय आहे, हे वारंवार तपासण्याचा प्रयत्न अजिबात करू नये. अनेक जण दिवसात अनेक वेळा शेअर्सच्या किमतींमध्ये होत असलेले चढउतार टीव्हीवर किंवा इंटरनेटवर बघत राहतात. खरं म्हणजे या चढउतारांमध्ये तसा काहीच अर्थ नसतो आणि त्यांच्यामुळे आपल्या दीर्घकालीन गुंतवणुकीवर कसलाच परिणाम होत नसतो. उलट आपण हे चढउतार वारंवार बघत राहिल्यामुळे आपल्या मेंदूमधल्या अल्पकालीन म्हणजेच 'सिस्टिम १' प्रकारच्या यंत्रणेला उत्तेजित करण्याचं आणि 'सिस्टिम २' या शांत प्रकारच्या यंत्रणेला काम करण्याची अजिबात संधी न देण्याचं कृत्य आपल्या हातून घडतं. साहजिकच आपण घिसाडघाई करून चुकीचे अल्पकालीन निर्णय

घेण्याची चूक हमखास करून बसतो. आपण सातत्यानं खरेदी-विक्री करावी, यासाठीचे इशारेच अप्रत्यक्षरीत्या आपल्या मेंदूवर शेअर बाजारातून आदळत असतात. त्यांना बळी पडायचं नसेल, तर फार फार तर शेअर बाजाराचे दिवसाचे व्यवहार बंद झाल्यावर दिवसाअखेरची पातळी फक्त एकदा तपासावी.

- *पटकन कृती न करणं :* आपल्या गुंतवणुकीशी संबंधित असलेल्या चुका शक्य तितक्या कमी करण्यासाठी आपल्याला कितीही मोह झाला, तरी एखादी कृती न करण्याची शिस्त लावून घेणं खूप गरजेचं असतं. म्हणजेच आपल्याला खरेदी-विक्रीचा मोह झाला, तरी तो टाळून त्याविषयी खूप विचार करून मगच त्यासाठीची कृती करणं महत्त्वाचं आहे.

अतुल कहाते यांचे साहित्य

स्टीव्ह जॉब्स : एक झपाटलेला तंत्रज्ञ!	१५०/-
वॉरन बफे	२३०/-
अमेरिकी राष्ट्रपती	४९५/-
रुपेरी सिंधू	१२५/-
ॲडॉल्फ हिटलर	४२५/-
हिलरी क्लिंटन	२७०/-
बेंजामिन ग्रॅहॅम	१७०/-
वॉरन बफेच्या यशाचे ५० मंत्र	१७०/-
गुंतवणूकभान	१८०/-
अंतराळ स्पर्धा	२५०/-



सर्पाचा सूड



महाभारत हा अनेक कथांचा महाकोश म्हणावा लागेल इतकी लहान-मोठी कथानके आणि उपकथानके त्यात आहेत. बहुतेक युद्ध आणि त्याची पार्श्वभूमी यासंबंधी कथा आपल्या वाचनात सहजी येतात; पण काही कथानके अशीही आहेत जी फारशी प्रचलित नाहीत. त्याच सगळ्या कथा या संग्रहात सुधाजींनी समाविष्ट केल्या आहेत. त्या मनोगतात अगदी प्रामाणिकपणे सांगतात की या सगळ्या कथा लहानपणी त्यांनी आजीकडून ऐकलेल्या आहेत... एकूण ३४ कथांचा यात समावेश आहे... त्यातल्या काही कथा कदाचित आपल्या पिढीच्या वाचनात आल्याही असतील, जसे जनमेजयाचा सर्पयज्ञ, यक्षाचे प्रश्न वगैरे; पण सध्या जी मुले इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेताहेत त्यांच्यासाठी सगळ्याच कथा नवीन आहेत... खरंतर हे बालसाहित्य नाही; पण मुलांना वाचायला द्यायला हवे इतके छान आहे... कथा रंजक पद्धतीने सांगितल्या आहेत आणि काही तर खरंच नवीन आहेत, जशी उडुपी राजा, बार्बारिक, घटोत्कचाची चतुराई, अर्जुनाची नावे... भन्नाट आहेत. जेमिनी ऋषींची माहितीही मला याच पुस्तकातून मिळाली. कुरु वंश त्याचे नाव कसे पडले, वंशावळ अगदी सोपे करून मांडले आहे. मला सुधा मूर्तींच्या लेखनाचे एक वैशिष्ट्य कायम भावते ते म्हणजे आपली

संस्कृती, आपली मूल्ये, त्याची पाळेमुळे यावर त्यांची नितांत श्रद्धा आहे आणि ती त्या प्रभावीपणे मांडत जातात. लीनाजींचा अनुवाद नेहमीसारखा चपखल... कुठेही ओढूनताणून दिलेले शब्दाला शब्द नाहीत. महाभारतातल्या या फारशा प्रचलित नसणाऱ्या कथा... जरूर वाचा.

– यशश्री रहाळकर

साद घालतो कालाहारी

कालाहारी वाळवंटाच्या अत्यंत दुर्गम भागात अतिशय अवघड परिस्थितीत, केवळ विलक्षण प्राणिप्रेमासाठी, दुर्दम्य इच्छाशक्तीने सात वर्षे राहिलेल्या जोडप्याची ही चित्तथरारक कथा आहे. वन्यजीवन, वन्य प्राणी यांचे लेखकाने घेतलेले अनुभव वाचताना आपणच कालाहारीच्या वाळवंटात आहोत असं वाटतं. रहस्यकथेपेक्षाही अत्यंत उत्कंठा लावणारं हे पुस्तक आहे.

– अनुराधा पवार

अशीच काही पानं...

कन्नड साहित्यातील 'सुप्रभात'... मराठी साहित्यामध्ये 'नवकथा' आणि 'नवकविता' या संकल्पनांनी फार मोठा बदल घडवून आणला. त्यातूनच पुढे विविध प्रकारच्या लेखन प्रयोगांना चालना मिळाली. मराठी साहित्यसृष्टी आधुनिक काळाशी स्वत:ला जोडून घेत कालसुसंगत साहित्य प्रसवत राहिली. महाराष्ट्राच्या शेजारीच असलेल्या कर्नाटक प्रांतालाही साहित्याची मोठी परंपरा आहे. त्या स्त्रीवादी नवलेखनाची सुरुवात एका मराठी स्त्रीने केली होती. हे एक वेगळेच वैशिष्ट्य आहे. १९५२मध्ये कर्नाटकातून 'सुप्रभात' हे मासिक निघू लागले. गिरिबाला हे साहित्यिक टोपणनाव धारण केलेली कुणी विदुषी त्याची प्रकाशिका, संपादक आणि लेखिकासुद्धा होती. तिच्या कथालेखनातून आधुनिक

जगातल्या नव्या स्त्रीच्या भावना, जाणिवांचा उच्चार होत होता. शिवाय तिला कन्नडसह तमिळ, इंग्रजी वगैरे भाषा तर येतातच; पण मराठी ही तिची मातृभाषा आहे. कोण ही बाई? मग सगळ्यांना कळले की, इंग्रज सरकारचे मद्रासचे (आत्ता चेन्नई) डेप्युटी कलेक्टर आणि सिंगापूर ट्रेझरीचे अकाउन्टन्ट जनरल अंबिकापती रामशास्त्री राजवाडे या फार मोठ्या उच्चपदस्थ अणि श्रीमंत माणसाची ही विधवा पत्नी असून, त्यांचे नाव सरस्वतीबाई राजवाडे असे आहे; परंतु गिरिबाला ऊर्फ सरस्वतीबाई राजवाडे यांची ही नवसाहित्यपताका फार काळ चालू राहिली नाही. त्यांच्या घराण्यात एक वंशपरंपरा चालत आलेली. सुमारे एक हजार वर्षांपूर्वीची शारदांबेची म्हणजे सरस्वतीची मूर्ती होती. एक देऊळ बांधून त्यात त्या मूर्तीची प्रतिष्ठापना करायची, अशी राजवाडे साहेबांची इच्छा होती; पण त्यांच्या हयातीत ते घडले नाही. आपल्या मृत पतीची ती इच्छा पूर्ण करण्याचे सरस्वतीबाईंनी ठरवले. साहित्य क्षेत्रातला मानसन्मान आणि वेगळी ओळख बाजूला ठेवून सरस्वतीबाईंनी उडुपी या शहरात शारदांबेचे मंदिर उभारले. उर्वरित आयुष्य त्यांनी त्या देवीच्या सेवेतच घालवले. १९९४ मध्ये वयाच्या ८१व्या वर्षी त्या मरण पावल्या. प्रस्तुत 'अशीच काही पानं' हे सरस्वतीबाई राजवाडे यांचे चरित्र कन्नड साहित्यातल्या नामवंत लेखिका वैदेही यांनी लिहिले आहे आणि कन्नडमधले उत्तमोत्तम ग्रंथ मराठीत आणणाऱ्या उमा कुलकर्णी यांनी ते अनुवादित केले आहे. वैदेही या १९८७ मध्ये सरस्वतीबाईंच्या संपर्कात आल्या. म्हणजे त्यांना केवळ सातच वर्षे चरित्रनायिकेचा सहवास मिळाला. त्यांच्याशी वेळोवेळी झालेल्या गप्पांमधून वैदेही यांनी हे चरित्रधागे जुळवले आहेत.

– मल्हार कृष्ण गोखले

चीपर बाय दी डझन

लग्नानंतरच्या पहिल्याच प्रवासात फ्रँक आणि लीली या दोघांनी ठरवलं की आपल्याला बारा मुलं असावीत. फ्रँकला मुलं आवडायची आणि लीलीला झालेली मुलं आवडू लागली. 'चीपर बाय दी डझन' ही शंभर वर्षांपूर्वी लिहिली गेलेली भन्नाट विनोदी सत्य घटनेवरची कादंबरी. याला आत्मकथन म्हणावे लागेल; कारण त्या बारा मुलांपैकी बहीण-भाऊ या दोघांनी मिळून

त्या कुटुंबाची मजेदार कहाणी लिहिलीय. फ्रँक ज्युनिअर व अर्नेस्टाईन यांनी फक्त १४० पानांत कादंबरी संपवलीय. पुस्तक हातात घेतलं व सुरू झाला स्वतःशीच हासरा संवाद. दररोज हसता यावे यासाठी थोडे थोडे करून आठ दिवसांत कादंबरी संपवली. शैक्षणिक, गतीविषयी, वेळाविषयी अशा काही भन्नाट कल्पना अमलात आणल्यात की बस्स! फ्रँक स्वतः इंजिनिअर. अमेरिकेतील व जर्मनीतील मोठमोठ्या कंपनींचा सल्लागार. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त काम अचूकपणे कसे करावे यावरचे धडे देण्यासाठी फ्रँकला बोलावले जायचे. आजच्या भाषेत मॅनेजमेंट गुरू. सर्व संकल्पना घरी अमलात आणल्या जायच्या. यातूनच फक्त सतरा वर्षांत बारा मुलांचे कुटुंब उभे राहिले. अनेक उपक्रमांचा जनक, स्वतःच्या शैक्षणिक कल्पना त्या वेळी थिएटरमध्ये दाखविल्या जायच्या.. लीलीही काही कमी नव्हती. ती होती निष्णात भाषणतज्ज्ञ. तिच्या भाषणांचे कार्यक्रम व्हायचे. एवढ्या प्रचंड कुटुंबात प्रत्येकजण शिस्तीत प्रगती करतोय ही खरंच कमालीची गोष्ट आहे. एक-दोन मुलांना सांभाळताना होणारी कसरत आठवली की बारा मुलांचा सांभाळ ही भयावह कल्पना वाटते. त्याच कादंबरीवर छानसा सिनेमाही पाहाच. अनेक भाषांत भाषांतरे झालीत. पानापानांत छोटे छोटे विनोद व नवनवीन प्रयोग, हास्याचे फवारे, कुणीतरी पाहतंय म्हणून चोरून हसण्याचा नवीन प्रकारही वाचताना घडतोच.

– दयानंद पोतदार

द लास्ट गर्ल

अंगावर काटा आणणारे हे पुस्तक आहे. नादियाची इच्छाशक्ती प्रबळ होती. मृत्यूच्या जबड्यात असतानाही संयमाने स्वत:ची सुटका करून घेतली. नादियाने आपलं सर्वस्व गमावलं. कुटुंब गमावलं. डोळ्यांदेखत सगळ्याची राखरांगोळी झाली. यावर नादियाने मात केली.

– संदीप पाटील

१६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी, २०२२ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

खालील संचांवर १६ ते ३१ जानेवारी दरम्यान खास सवलत

१६ जानेवारी - नानी पालखीवाला यांचा जन्मदिन
'वुइ, दि नेशन', 'वुइ, दि पीपल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ६२०/- । सवलत किंमत ४२९/-

---

१६ जानेवारी - मिलिंद गाडगीळ यांचा जन्मदिन
'संधिकाल' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९९/-

---

१७ जानेवारी - मालविका आमडेकर यांचा जन्मदिन
'कांगारू देशीच्या गोष्टी' (४ पुस्तकांचा संच) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-

---

१९ जानेवारी - अभिजित कुलकर्णी यांचा जन्मदिन
'रेड टेप' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २४९/-

---

२१ जानेवारी - डॉ. प्रतिभा राय यांचा जन्मदिन
'पूजाघर', 'काया' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ४७५/- । सवलत किंमत २९९/-

---

२१ जानेवारी - पॉल ॲलन यांचा जन्मदिन
'आयडिया मॅन' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-

---

२२ जानेवारी - आर्यन कायले यांचा जन्मदिन
'द गॉड ऑफ ॲनिमल्स' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-

---

२३ जानेवारी - नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती
'नेताजी', 'नेताजी सुभाषचंद्र बोस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ५९०/- । सवलत किंमत ४१९/-

२३ जानेवारी - प्रमिला जरग यांचा जन्मदिवस
'आदिपर्व', 'शिवपुत्र राजाराम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ६०९/-

२३ जानेवारी - बाळासाहेब ठाकरे यांचा जन्मदिवस
'एकवचनी भाग १ आणि २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५४९/-

२३ जानेवारी - चार्ल्स ग्लास यांचा जन्मदिन
'ते एकाकी लढले' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-

२४ जानेवारी - मिचिओ काकू यांचा जन्मदिन
'अशक्य भौतिकी' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-

२६ जानेवारी - प्रजासत्ताक दिन
'फ्रीडम ॲट मिडनाइट', 'मोहनदास', 'परमवीर चक्र : रणांगणावरील आपले महान योद्धे', 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया', 'महामानव सरदार पटेल', 'नेताजी','क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'सैनिक हो, तुमच्यासाठी...', 'सत्तरीतला भारत', 'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष', 'जालियनवाला बाग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ४५४५/- । सवलत किंमत २९७९/-

२६ जानेवारी - अनिता नायर यांचा जन्मदिवस
'लेडीज कूपे', 'विस्मरणातच सर्वकाही!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ६१०/- । सवलत किंमत ३९९/-

२६ जानेवारी - जोनाथन कॅरोल यांचा जन्मदिन
'द घोस्ट इन लव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-

२८ जानेवारी - मायकेल हेस्टिंग्ज यांचा जन्मदिन
'आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-

२८ जानेवारी - डॉ. अरुणा कौलगुड यांचा जन्मदिवस
'इंटरव्ह्यू टेक्निक्स आणि प्रेझन्टेशन स्किल्स', 'जगप्रसिद्ध व्हा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २७५/- । सवलत किंमत १६९/-

२८ जानेवारी - डॉ. क्रेफ्लो डॉलर यांचा जन्मदिन
'वादळातील दीपस्तंभ' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-

३० जानेवारी - पिंकी विराणी यांचा जन्मदिवस
'पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब', 'अरुणाची गोष्ट', 'डेफ हेवन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८१५/- । सवलत किंमत ५४९/-

खालील संचांवर १ ते १५ फेब्रुवारी दरम्यान खास सवलत

१ फेब्रुवारी - सोफी लगूना यांचा जन्मदिन
'वन फुट राँग' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-

२ फेब्रुवारी - खुशवंत सिंग यांचा जन्मदिवस
'माझ्या आयुष्यात आलेल्या स्त्रिया आणि पुरुष', 'सेक्स, स्कॉच अँन्ड स्कॉलरशिप', 'द कंपनी ऑफ विमेन', 'मृत्यू ... माझ्या उंबरठ्याशी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ८७५/- । सवलत किंमत ५९९/-

३ फेब्रुवारी - दीप्ती नवल यांचा जन्मदिन
'द मॅड तिबेटियन : गोष्टी तेव्हाच्या आणि आत्ताच्या!' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-

४ फेब्रुवारी - डॉ. गौरी बोरकर यांचा जन्मदिवस
'गर्भसंस्कार', 'स्थूलतेला करा टाटा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-

४ फेब्रुवारी - फेसबुक डे
'द फेसबुक इफेक्ट' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-

५ फेब्रुवारी - गिरिजा कीर यांचा जन्मदिवस
'आकाशवेध', 'जन्मठेप' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३७०/- । सवलत किंमत १८९/-

८ फेब्रुवारी - जॉन ग्रिशॅम यांचा जन्मदिवस
'अ टाइम टु किल', 'द असोशिएट', 'द चेम्बर', 'द क्लायंट', 'द फर्म', 'द पेलिकन ब्रीफ', 'द रेनमेकर', 'द पार्टनर', 'द रनअवे ज्यूरी', 'द लास्ट ज्यूरर', 'द टेस्टामेंट', 'द स्ट्रीट लॉयर', 'द ब्रोकर', 'द इनोसंट मॅन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ६०९०/- । सवलत किंमत ३११९/-

८ फेब्रुवारी - अब्दुल्ला खान यांचा जन्मदिन
'पटना ब्लूज्' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-

१० फेब्रुवारी - अजित जाधव यांचा जन्मदिन
'वास्तु-अजित' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३७९/-

१० फेब्रुवारी - राधिका टिपरे यांचा जन्मदिन
'वेरूळ लेण्यांतील शिल्पवैभव' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत २०९/-

११ फेब्रुवारी - स्टिफन सी. लन्डिन यांचा जन्मदिवस
'फिश!', 'फिश! फॉर लाइफ', 'फिश! स्टीक्स', 'फिश! टेल्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ६७०/- । सवलत किंमत ४४९/-

११ फेब्रुवारी - सिडने शेल्डन यांचा जन्मदिन
'चेसिंग टुमॉरो' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१९/-

१२ फेब्रुवारी - दयानंद सरस्वती यांचा जन्मदिन
'महर्षी दयानंद सरस्वती' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ९५/- । सवलत किंमत ५९/-

१२ फेब्रुवारी - वैदेही यांचा जन्मदिन
'अशीच काही पानं...' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १३०/- । सवलत किंमत ८९/-

१२ फेब्रुवारी - राजेंद्र आकलेकर यांचा जन्मदिन
'कहाणी पहिल्या आगीनगाडीची' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-

१३ फेब्रुवारी - कोडी मॅकफॅदियेन यांचा जन्मदिन
'शॅडो मॅन', 'द डार्कर साइड', 'द फेस ऑफ डेथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १४८०/- । सवलत किंमत ९९९/-

१४ फेब्रुवारी - व्हॅलेंटाइन डे
संच १-'चिकन सूप फॉर द कपल्स सोल' 'दॅट थिंग कॉल्ड लव्ह', 'एक अनादि अनंत प्रेमकहाणी', 'प्रेमाची परिभाषा', 'अनादि-अनंत', 'अद्वैत', 'आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद', 'चिकन सूप फॉर द सोल टु लव्ह भाग –१ आणि भाग २' 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग', 'प्रेमकथा', 'द प्राइस ऑफ लव्ह', 'अन्कंडिशनल लव्ह', 'देवदास' या पुस्तकांवर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३६२०/- । सवलत किंमत २४४९/-

संच २ -'फिफ्टी शेड्स डार्कर', 'फिफ्टी शेड्स फ्रीड', 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २१००/- । सवलत किंमत १३९९/-

❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

website : www.mehtapublishinghouse.com

आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.

author@mehtapublishinghouse.com

नवीन संहिता... नवा आशय...

व्हिक्टोरियाच्या भारताशी असलेल्या संबंधाचा
पहिला सर्वसमावेशक वृत्तांत

सम्राज्ञी

महाराणी व्हिक्टोरिया आणि भारत



लेखक
माइल्स टेलर
अनुवाद
वर्षा वेलणकर

पृष्ठसंख्या : ५०० । किंमत : ₹६५० । पोस्टेज : ₹५०

Book Available

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/01/2022 Posting Date : 11/01/2022

नवीन संहिता... नवा आशय...









मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,